
शनिवार ८ सप्टेंबर १९७९
७५ पैसे

# माणूस

## सगळा संदर्भच गर्रकन फिरला....



सप्रेम नमस्कार

'माणूस'च्या गेल्या दोन अंकातील प्रतिभा रानडे यांची अफगाणिस्तानविषयक दोन्ही वार्तापत्रे फार आवडली. वार्तापत्रे माहितीपूर्ण व वाचनीय उतरलेली आहेत. ही वार्तापत्रे वाचल्यावर भारताशी इतिहासकालापासून विविध नात्यांनी संलग्न असलेल्या अफगाणिस्तानविषयी आपल्याला किती कमी माहिती आहे याचीही ढोबळ कल्पना आली! मुल्ला–मौलवींच्या कोंडवाडयात अडकलेल्या सुशिक्षित मुस्लिम स्त्रीची लेखिकेने सांगितलेली हकिगत, जर प्रत्येक भारतीय मुस्लिम भगिनीने वाचली, तर आपण भारतासारख्या सुजाण आणि शासकीय–धार्मिक सक्ती नसलेल्या देशात जन्माला आल्याबद्दल, त्या अल्लाला दुवा देतील.


इतिहासाच्या पुस्तकात ज्या (पानिपतच्या) अहमदशहा अबदालीचे संतापाच्या भरात मी डोळे फोडून टाकले होते, तो अबदाली अफगाणिस्तानचा 'फादर ऑफ दि नेशन' आहे हे वाचताना सगळा संदर्भच गर्रकन फिरला.

लेखिकेची भाषा सहजसुंदर व निवेदनशैली वेधक आहे. लेखिकेचे वास्तव्यच अफगाणिस्तानात असल्याने सर्व निवेदनाला प्रत्यक्ष प्रचीतीचा छान शिडकावा आहे. नाहीतर पुण्यात बसून जगाचे इतिहासही लिहिले जातातच!

लेखिकेला माझे धन्यवाद ऐकवा, तुम्ही कळवा, नाहीतर मला त्यांचा पत्ता कळवा.

२ सप्टेंबर १९७९ — वि. ग. कानिटकर, पुणे

---



'आत्ताच दिशा निश्चित केली पाहिजे' असे सांगून धारिया दिल्लीला तर गेले! पण तेथे जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने धारियांना हवी असलेली दिशा निश्चित करण्याचे नाकारले.

संघ–जनसंघ आणि जनता पक्ष संबंधांचा धारियांना फार महत्त्वाचा वाटणारा प्रश्न चंद्रशेखरांवर सोपवून, मोरवीचा महापूर, दुष्काळी परिस्थिती, आंतरराष्ट्रीय राजकारणात चरणसिंग सरकारमुळे भारताची झालेली मानहानी इत्यादी गैरमहत्त्वाच्या (!) प्रश्नांवरच कार्यकारिणीने सर्व वेळ खर्च केला....

## आता धारिया काय करणार?

—धावती मुलाखत....

पुणे वार्ता

# आत्ताच दिशा निश्चित केली पाहिजे

## —मोहन धारिया

सध्याच्या राजकीय परिस्थितीने सामान्य जनताच गोंधळात पडली आहे असं नव्हे, तर भलेभले राजकारणी नेतेही आपण नेमकी कोणती भूमिका घ्यावी व येत्या मध्यावधी निवडणुकीत जनतेला सामोरं जावं या विवंचनेत सध्या आहेत. अर्थात सामान्य जनता आणि हे राजकीय नेते या दोघांची गोंधळात पडण्याची कारणं वेगवेगळी आहेत. स्वतःच्या भवितव्याची चिंता या दोघांनाही पडलेली आहे; पण त्यांची भवितव्यच संपूर्णपणे निराळ्या प्रकारची आहेत. याच संदर्भात पुण्यातील माजी खासदार मोहन धारिया यांची शनिवार दि. १ सप्टेंबर रोजी एक खास मुलाखत घेतली.

**प्रश्न** : आजच्या राजकीय अस्थिरतेची आपल्या मते मुख्य कारणे कोणती ?

**उत्तर** : या प्रश्नाचा जर थोडासा खोलात जाऊन विचार केला तर असं लक्षात येईल की, १९४७ साली आपला देश स्वतंत्र झाल्यावर लगेच राजकीय व्यक्ती आणि राजकीय पक्ष या दोघांसाठी एक राष्ट्रीय आचारसंहिता तयार करायला हवी होती. ती जर तेव्हाच तयार केली गेली असती तर आजची ही परिस्थिती काही प्रमाणात टाळता आली असती.

सामान्य जनतेमधील विफलता आणि नैराश्य हे आजच्या राजकीय अस्थिरतेचं दुसरं महत्त्वाचं कारण आहे. ही विफलता नष्ट करण्याच्या संधी आत्तापर्यन्त किमान तीनदा तरी येऊन गेल्या; पण त्या तिन्ही वेळा आम्ही त्यांचा योग्य वापर करून घेण्यात अपयशी ठरलो. सर्वप्रथम १९४७ साली अशी संधी आली होती; पण पं. नेहरूंना तिचा उपयोग करून घेता आला नाही. १९७१–७२ साली इंदिरा गांधींनी असं सांगितलं की, मी वचनपूर्तीचंच राजकारण करीन. त्या वेळी जी इंदिरा-लाट आली ती आणण्याला इतरांप्रमाणेच मीही काही प्रमाणात जबाबदार होतो; पण इंदिराजीही त्यामध्ये अपयशी ठरल्या. त्यामुळेच जयप्रकाशजींचं आंदोलन, आणीबाणी व १९७७ सालच्या निवडणुका हे स्फोट उडत गेले.

**प्रश्न** : जनतेमधील वैफल्य नष्ट करण्यात जनता पक्ष अपयशी ठरला असेल तर त्याला आपणही जबाबदार नाही का ?

**उत्तर** : आम्ही याबाबतीत आग्रह धरले नाहीत असं नाही, आम्ही प्रेसकडे गेलो नाही किंवा जाहीर विधानं केली नाहीत, निवेदनं दिली नाहीत याचा अर्थ आम्ही गेली दोन-अडीच वर्षं स्वस्थ बसलो होतो, असं नाही. राजकीय व्यक्ती आणि पक्षांच्या वर्तन आणि कृतीसाठी एक आचारसंहिता निर्माण केली जावी यावर मी सातत्याने भर देत होतो, त्यासाठी आग्रह धरत होतो. प्रत्येक मंत्र्याने व खासदाराने आपली संपत्ती जाहीर करावी, असं ठरल्याबरोबर आम्ही काही लोकांनी आमची संपत्ती जाहीरही केली; पण जनता पक्षातूनच याला फार मोठा विरोध होता आणि आमच्या पक्षातीलच कित्येकांनी अजूनही आपली संपत्ती जाहीर केलेली नाही.

याचबरोबर एखाद्याच्या विचारात बदल झाला, मतपरिवर्तन घडून आलं तर त्याने पक्षांतर करायला कांहीच हरकत नाही; पण ते करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीने आपल्या सर्व पक्षांचाही राजीनामा द्यायला हवा. पक्षांतरबंदीविधेयक लोकसभेत संमत होणं अवघड नव्हतं; पण जनता पक्षानंच त्यामध्ये

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : पंधरावा
८ सप्टेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

पुढाकार घेतला नाही. आम्ही आमचे पक्ष कसे चालवणार आहोत हा खरा प्रश्न आहे. तरुणांच्या आशा–आकांक्षा पूर्ण करण्याचं साधन अशी जनतेची जनता पक्षाबद्दलची भावना व्हायला हवी होती; पण आम्ही जनता पक्षाची तशी प्रतिमा निर्माण करण्यात अयशस्वी ठरलो. याची मुख्य तीन कारणं आहेत. त्यातील पहिलं कारण जनता पक्ष हा पक्ष म्हणून कधी निर्माणच होऊ शकला नाही. आम्ही वारंवार आश्वासनं दिली; पण घटकवादाने पक्ष पोखरला गेला. पंतप्रधान-पदाची निवड, मंत्रिमंडळाचा विस्तार, विधानसभेच्या निवडणुका या प्रत्येक वेळी घटकवादाने आम्हाला ग्रासले. व्यक्तिगत सत्तास्पर्धा हे जनता पक्षाच्या अपयशाचं दुसरं कारण–तसंच पक्षामध्ये परस्पर विश्वासाचं वातावरण कधीच निर्माण न झाल्यामुळंही आमचा पक्ष जनतेच्या अपेक्षा पुऱ्या करण्यात अयशस्वी ठरला.

**प्रश्न :** दुहेरी सदस्यत्वाचा प्रश्न देशापुढील इतर कोणत्याही प्रश्नापेक्षा आपल्याला महत्वाचा वाटतो का ?

**उत्तर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने काम करण्यात काहीही गैर नाही. उलट त्यांच्या चांगल्या कामांना प्रोत्साहनच दिलं पाहिजे. हिंदुधर्माचा प्रसार जगभर करण्यात यावा यासाठी स्वामी विवेकानदांनी काम केलं तसं काम व्हायलाही हरकत नाही. ज्या पार्श्वभूमीवर जनसंघाची निर्मिती झाली तीही मी समजू शकतो. पण या सगळ्या बरोबरच बदलत्या संदर्भानुसार विचार आणि आचरणातही बदल हवेत. संघाबद्दलच्या माझ्या अपेक्षा मी बाळासाहेब देवरसांजवळ १ जुलै १९७७ साली माझ्या घरी व ११ मार्च १९७९ साली अटलबिहारी वाजपेयींच्या घरी व्यक्त केल्या होत्या. ज्या देशात २२ कोटी मागासवर्गीय आणि दलित आहेत, दहा कोटी मुस्लिम आहेत व तीन–चार कोटी ख्रिश्चन आहेत तिथे हिंदुराष्ट्राची कल्पना मला मान्य नाही. यातून आम्ही जनतेचा पाठिंबा आणि विश्वास गमावत आहोत. तसंच हे जर कायम राहिलं तर निधर्मी पक्ष म्हणून जनता पक्ष स्वतःची प्रतिमा जनमानसात निर्माण करू शकणार नाही.

राजकीय पक्षाला संघटना लागतात, तशा त्या पक्षाकडून निर्माण केल्या जातात हे मला मान्य आहे. आज कित्येक जनता आमदार–खासदार पदाधिकारी आर. एस्. एस्. चे पूर्णवेळ कार्यकर्ते आहेत. हिंदुराष्ट्रामध्ये धर्माची कल्पना अनुस्यूत नाही, भौगोलिक प्रदेशाची आहे, असं स्पष्टीकरण संघाकडून दिलं जातं. पण हे स्पष्टीकरण ज्यांच्यासाठी केलं जातं त्यांनाच ते पटत नसलं तर त्याचा काय उपयोग ? अर्थात यावर चरणसिंगांनी स्वीकारलेला मार्गही गैर आहे. पण हे जर असंच चालू राहणार असेल तर आमच्यासारखे लोक या पक्षात राहूच शकणार नाहीत. या प्रश्नाचा निर्णय लागलाच पाहिजे.

**प्रश्न :** पण सध्याच्या राजकीय परिस्थितीत हा वाद उकरून काढणं कितपत योग्य वाटतं ?

**उत्तर :** या प्रश्नाचा निकाल लागावा म्हणून एरवीही आम्ही आग्रह धरलाच असता, पण आता मध्यावधी निवडणुकांमुळे आम्हाला या प्रश्नाचा कायमचा निकाल लावण्याची घाई झाली आहे. कारण आम्ही जर हा निकाल न लावताच निवडणुकीत जनतेसमोर गेलो तर आम्हाला मार खावा लागेल. त्यासाठी नुसतं जगजीवनरामांना नेता करून भागणार नाही. राष्ट्रपतींचा लोकसभा बरखास्त करण्याचा निर्णय मला मान्य नाही. त्यांनी जगजीवनरामांना मंत्रिमंडळ बनवण्यासाठी पाचारण करायला हवं होतं. पण ही परिस्थिती निर्माण व्हायला आम्हीसुद्धा जबाबदार आहोत. सध्या राष्ट्रपतींवर केली जात असलेली टीकाही त्यादृष्टीने अयोग्य आहे.

**प्रश्न :** या सबंध परिस्थितीत आपण निश्चित कोणती बाजू घेणार आहात ?

**उत्तर :** माझी भूमिका संघर्षाची नाही, समन्वयाची आहे आणि म्हणूनच एकत्र बसून प्रश्न सोडवण्यावर माझा भर आहे, विश्वास आहे; पण संघर्ष करणाऱ्यांच्याही भावना आपण ध्यानात घेतल्या पाहिजेत. मी नुकतंच या सबंध प्रकरणावर चंद्रशेखरांना एक सविस्तर पत्र लिहिलं आहे. जनता पक्षाच्या कार्यकारिणीमध्ये त्यावर चर्चा होईल आणि मग मी माझा निर्णय करीन.

**प्रश्न :** जनसंघाच्या मंत्र्यांनी आर. एस. एस. शी संबंध ठेवल्यामुळे जनता सरकारच्या अंमलबजावणीवर काही विपरित परिणाम झाला का ? जनतेला दिलेले कार्यक्रम राबवू शकला नाहीत हे तुम्हा मंत्र्यांचंच अपयश नव्हे का ?

**उत्तर :** पक्षामध्ये जर असे मतभेद चालूच राहिले तर कार्यक्रमांची अंमलबजावणी तरी योग्य तऱ्हेने कशी होणार ? तसंच कोणत्याही कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी जनता तुमच्याबरोबर हवी. दुहेरी सदस्यत्वाच्या या प्रश्नामुळे आम्ही जनतेचा विश्वास गमावला. देशातील दलित आणि मागासवर्गीयांना इंदिराजींनी जो दिलासा दिला तो आम्ही देऊ शकलो नाही, ही वस्तुस्थिती आहे. आम्ही अजूनही काही काळ संयम राखू; पण जनता स्वस्थ बसणार नाही.

**प्रश्न :** ज्याला आपण मगाशी चर्चा करून विचारविनिमय करून मगच माझा निर्णय घेईन, असं म्हणालात, त्यालाच काही जण ' आपण नेमक्या संधीची वाट पहात आहात ' असं म्हणताहेत...

**उत्तर :** संधीची ? कसल्या संधीची ? मला अशी काय संधी मिळायची राहिली आहे ? माझ्याबद्दल असा निष्कर्ष काढणं हा माझ्यावर अन्याय आहे. आजपर्यंत कित्येक वेळा धोका स्पष्ट दिसत असताना मी तो पत्करलेला आहे. १९७१ नंतरही मी इंदिराजींच्या विरोधात उभा राहिलो आणि मंत्रिपद घालवलं. आयुष्यात मी कधी स्वास्थ्य स्वीकारलेलंच नाही. खंबीरपणाचंच म्हणत

असाल तर सध्याच्या महाराष्ट्र सरकारचं रेकॉर्ड काढा. त्यातले कितीजण आपल्या तत्त्वांशी खंबीर राहिले आहेत ? मी देखील खासदारपद गेल्यावरच हा issue उपस्थित केला. कारण पक्षाचा खासदार असताना या प्रश्नाची जाहीर वाच्यता करणं मला योग्य वाटलं नाही. अर्थात वेळ आली असती तर खासदारपदाचा राजीनामा देऊनही मी या प्रश्नाची तड लावायला मागेपुढे पाहिलं नसतं. धर्मनिरपेक्ष, पुरोगामी शक्ती एकत्र आणण्याचा माझा प्रयत्न राहील.

**प्रश्न** : म्हणजे आपण जनता (एस)मध्ये जाणार की कॉंग्रेस (आय) मध्ये ? कारण ही धर्मनिरपेक्षता आणि पुरोगामित्व आपली-ही विशेषणं असल्याचं हे दोन्ही पक्ष सांगतात.

**उत्तर** : मी इंदिरा कॉंग्रेसमध्ये निश्चित-पणे जाणार नाही आणि खरं म्हणजे याचा राजकीय पक्षाशी काही संबंधच नाही. आपण पुण्यातूनच उभं राहावं असं मला वाटतंय; पण उभं राहून तरी काही साध-णार आहे का, याचाही विचार करण्याची वेळ आता आली आहे. माझ्याजवळ कोणतेही स्वार्थी हिशेब नाहीत. पुण्याचं प्रतिनिधित्व करत असताना दुहेरी सदस्यत्वाचा प्रश्न काढून मी कोणतं संकट ओढवून घेत आहे याचीही मला जाणीव आहे; पण धोके पत्करूनही आपण काही तरी निश्चित दिशा ठरवली पाहिजे असं मला वाटतं आणि ते करत असताना जनतेने माझ्याविरुद्ध कौल दिला तरी त्याचाही मी आनंदाने स्वीकार करीन.

—प्रतिनिधी 'माणूस'

# पुन्हा एकदा

## 'डॉक्टर्स जगवतात की नागवतात ?'

### बी. जे. मेडिकलमधील परिसंवाद

बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या गणेशोत्सवाचा एक भाग म्हणून बी. जे. च्या डिबेटिंग सर्कलने 'डॉक्टर्स जगवतात की नागवतात ?' ह्या विषयावर एक परिसंवाद बी. जे. च्या सभागृहात आयोजित केला होता.

२९ ऑगस्ट, वेळ सकाळी ११, सभागृह विद्यार्थ्यांनी खच्चून भरलेले. सार्वजनिक कार्यक्रम असल्याने काही इतरही डोकी दिसत होती. त्यातलाच मी एक. वैद्यकीय क्षेत्राशी निगडित पण व्यापक सामाजिक प्रश्नावर बी. जे. सारख्या ठिकाणी परिसंवाद अभावानेच होतात म्हणून मला विशेष उत्सुकता.

डॉ. अनिल अवचट यांनी ह्याच विषयावर काही वर्षांपूर्वी 'किर्लोस्कर' मासिकात लेख लिहून बरीच खळबळ निर्माण केली होती म्हणून अर्थातच त्यांना वक्ता म्हणून बोलावले होते. शिवाय ॲडव्होकेट ग. नी. जोगळेकर, ॲड प्र. बा. जोग, डॉ. उल्हास लुकतुके, डॉ. गंगवाल, डॉ. जोशी, डॉ. सतीश देसाई, सोवतकार ग. वा. बेहेरे ह्यांना पाचारण करण्यात आले होते. डॉ एस्. एन. रानडे यांना बी. जे. च्या अशा कार्यक्रमांना बोलवण्याची प्रथा पाळली गेली. ॲड. जोगळेकर वगळता ह्या सर्व मंडळींनी डॉ. अनिल अवचटांच्या लेखावर ज्या प्रकारे हल्ला चढवला वा जो दृष्टिकोन स्वीकारला ते बरेच उद्बोधक वाटले. बुद्धिवान म्हणून समजली जाणारी मडळी सामाजिक प्रश्नांवर कसे उथळ विचार मांडतात ते ऐकायला मिळाले. आपल्या ज्ञानाचा अहंकारही काही 'हुषार' डॉक्टरांच्या बोलण्यातून जाणवला.

ॲड. प्र. बा. जोग यांच्या भाषणात काहीच मुद्दा नव्हता. 'काही अश्लिल तर काही चक्क किळसवाण्या कोटचा' एवढेच त्यांच्या भाषणाचे स्वरूप होते. सांस्कृतिक कार्यक्रमाला 'असला' पदर असण्याची विद्यार्थ्यांची पारंपारिक अपेक्षा असणे हे बी. जे. चे वैशिष्ट्य; पण त्यांनाही जोग रुचले नाहीत. असल्या माणसाला सार्वजनिक समारंभात स्थान देण्याचा मूर्खपणा कोणी यापुढे तरी करू नये.

डॉ. उल्हास लुकतुके हे सामाजिक समस्यांचे भान असलेले; पण त्यांनी ज्या प्रकारे मूळ मुद्द्याला बगल देणारा, गैरलागू युक्तिवाद मांडून आजच्या डॉक्टरी धंद्याचे जे एक प्रकारे समर्थन केले याचे आश्चर्य वाटले. भारतात ब्रिटिशांनी वासाहातिक लुटीतून मिळवलेल्या पैशातून मिशनरी लोकांना पैसा देऊन वैद्यकीय सेवा निर्माण केल्या. त्यामुळे 'डॉक्टर सेवाभावी असला पाहिजे' अशी चुकीची कल्पना आपल्या डोक्यात आहे; पण इतर पुढारलेल्या देशात असे नाही. डॉक्टरकी हा एक धंदा आहे व केवळ ग्राहकांचा विचार करून चालणार नाही तर डॉक्टरला योग्य तितके पैसे व व्यावसायिक समाधान मिळाले पाहिजे हे लक्षात घेतले पाहिजे हा डॉ. लुकतुक्यांचा प्रमुख मुद्दा; पण डॉक्टरकी हा धंदा असण्याला अनिल अवचटांचा विरोध नाही तर त्यातील फसवणुकीला विरोध आहे. 'अमेरिकेत चालणारे संशोधन हे 'तिसऱ्या

जगात मिळवलेल्या पैशांवर आधारित आहे. आपल्याला मात्र स्वतःच्याच देशातून पैसा उभा करावा लागतो म्हणून आपल्या येथील वैद्यकीय सेवा थोडी महागडी असणारच ' असा त्यांचा दुसरा मुद्दा. खरं म्हणजे संशोधन निरनिराळ्या संस्थांमध्येच होते. त्यामुळे जनरल प्रॅक्टिशनर्सनी महागडे दर ठेवणे मुळीच समर्थनीय नाही.

डॉ. गंगवाल व डॉ. जोशींनी तर ' बिलो द बेल्ट ' हल्ले केले. ' सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी, चिखलफेक करण्याच्या क्षुद्र मनोवृत्तीतून, स्वतःची प्रॅक्टिस चालत नव्हती अशा निरुद्योगी काळात ' अनिल अवचट यांनी हा समाजकंटकी उद्योग केला, असले वैयक्तिक आरोप करण्यात डॉ. जोशींनी भूषण मानले. अर्थातच हे कोणालाच रुचले नाही. ' शेवटी वैयक्तिक हेतूबद्दल आरोप करू नका ! ' असे अध्यक्षांना सांगावे लागले. डॉ. जोशींच्या भाषणात मुद्दाच काढायचा झाला तर ' तुम्ही वाईट तेवढे बघता, काही अपवादात्मक उदाहरणांच्या सहाय्याने सर्व वैद्यकीय व्यवसायाला बदनाम करता ' असा एक आरोप होता व ' बिगर वैद्यकीय मंडळींना वैद्यकीय क्षेत्राबद्दल आक्षेप घेण्याचा अधिकारच नाही. कारण त्यांना तेवढे ज्ञान नसते व म्हणून त्यांची लायकीही नसते,' असाही एक मुद्दा त्यांनी पुढे केला; पण वैद्यकीय व्यवसायात फसवणूक मोठ्या प्रमाणावर चालत नसून ती अपवादात्मक आहे हे दाखवण्याचा प्रयत्नही डॉ. जोशींनी केला नाही ' तुरळक उदाहरणांवरून एकूण व्यवसायाला बदनाम करता ' असा केवळ आरोपच केला. दुसऱ्या मुद्द्याला डॉ. अनिल अवचटांनी नंतर उत्तर दिले.

" ज्ञान जरी नसले तरी फसवणूक आहे हे पेशंटसना जाणवते व त्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या गोष्टींबद्दल त्यांचे मत विचारात घेतलेच पाहिजे ! " पेशंटस्चे वैद्यकीय क्षेत्राबद्दलचे ज्ञान वाढवण्याची जबाबदारी डॉक्टरांची आहे. ती पार पाडायची सोडून " तुम्हाला काय कळतंय ? " असे म्हणून सर्व निर्णय, चर्चा फक्त आपापसातच करण्याचा आग्रह डॉक्टरांनी का धरावा ? या न्यायाने देशातील सर्व कारभार काही मूठभर, ' हुषार ' तंत्रज्ञांच्या हातात सोपवावा लागेल. एक गोष्ट मात्र खरी आहे की काही वेळा डॉक्टरची काही चूक नसताना केवळ स्वतःच्या अज्ञानामुळे डॉक्टरबद्दल पेशंटच्या मनात गैरसमजूत निर्माण होते; पण डॉ. अनिल अवचटांच्या लेखाबद्दल अर्थातच हे लागू नाही. ॲड. प्र. वा. जोग यांनी केलेल्या टीकेकडे कोणीच गंभीरपणे पहाणार नाही. ॲड. जोगळेकरांनी ' आपल्याला वैद्यकीय ज्ञान नाही ' हे लक्षात घेऊन फक्त ' एका पेशंटच्या व्यथा ' म्हणून स्वतःचे काही अनुभव मांडले. कोणतेही सर्वसाधारण आरोप वा विधाने केली नाहीत. डॉक्टर्स काही वेळा पेशंटस्शी कसे निष्काळजीपणे वागतात हे त्यांनी सांगितलेल्या अनुभवांवरून निर्विवाद दिसत होते.

डॉ. गंगवाल यांनीही " मूठभर अज्ञानी लोकांनी केलेल्या चिखलफेकीकडे दुर्लक्ष करा " असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. " अमेरिकेत दात काढायला २०० रु. घेतात. आपल्याकडे फक्त दोन ते पाच रुपये घेतात; गरिबांसाठी सरकारने स्वस्त रुग्णालये काढावीत, आम्ही त्यात ऑनररी काम करू ... " असे मुद्दे मांडले. एक म्हणजे अमेरिकेत जे काही चालते ते स्टॅंडर्ड मानण्याची प्रवृत्तीच मुळी चुकीची आहे. दुसरे म्हणजे अमेरिकेतील सर्वसाधारण रहाणीमानच जास्त आहे हेही त्यांनी सोयिस्करपणे नजरेआड केले. खाजगी डॉक्टरी व्यवसायात फसवणूक होऊ नये, दर वाजवी असावेत ह्या मुद्द्याला सरकारने स्वस्त दवाखाने काढावेत ' हे उत्तर असू शकत नाही हे सुवर्ण-पदक पटकावलेल्या हुषार डॉक्टरांना का कळू नये ? शेवटी " हत्ती चलता रहता है, कुत्ते भोंकते रहते हैं " असा शेरा मारून ते डॉ. जोशींच्या पातळीवर घसरले.

ग. वा. बेहरेंचे म्हणणे होते की, " वकील, व्यापारी, कारखानदार, वृत्तपत्रकार सर्वच समाजाला नागवतात. कारण ज्याच्याकडे पैसा तो मोठा अशीच भावना समाजात निर्माण झाली आहे. मग डॉक्टरांना का दोष देता ? " सर्व समाजाने पैसा मिळवणे हे मूल्य मानले आहे हे खरे आहे; पण म्हणून त्याविरुद्ध आवाज उठवणे हे कसे चुकीचे ठरते ? त्यांचा दुसरा प्रमुख मुद्दा म्हणजे– " डॉक्टर बनण्यासाठी शिक्षणावर खूप खर्च करावा लागतो, दवाखाना थाटण्यासाठी, तो सजवण्यासाठी, रुबाबात रहाण्यासाठी बराच खर्च येतो. हा रुबाब रोग्यालाही आवडतो व त्यामुळे त्याचा निम्मा रोग पळून जातो; पण त्यासाठी लागणारा खर्च त्यानेच नको का द्यायला ? " ह्या समर्थनावर डॉ. अनिल अवचटांचे म्हणणे असे की, " डॉक्टर म्हटला की सजवलेला दवाखाना,


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा.........

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

रिसेप्शनिस्ट, मोटार इ. आलेच ही कल्पनाच आपल्या डोक्यातून काढून टाकली पाहिजे. आपल्या गरीब देशात हे पेशंटस्ना परवडत नाही व त्याची गरजही नाही. पेशंटचा विश्वास संपादन करण्यासाठी सजावटीची गरज नसते. पेशंटस्शी आत्मीयतेने वागले पाहिजे, त्याच्या सर्व प्रश्नांचा विचार करून वागले तर त्याचा विश्वास संपादन करता येतो." हे म्हणणे वैद्यकीय विद्यार्थ्यांनाही पटेल. मात्र ते कितपत प्रत्यक्षात आणतील याबद्दल शंकाच आहे.

डॉ. सतीश देसाई थोडेसे निवडणुकीच्या सभेत बोलल्यासारखे बोलले. फार जोरात व अवास्तवव आदर्शवादी भूमिका घेऊन. 'डॉ. जयप्रकाश नारायणांना कोणी वाचवले? आज भारतात देवीचा रोगी शोधून सापडत नाही हे कोणाच्या प्रयत्नांमुळे?' असा युक्तिवाद त्यांनी प्रथम मांडला; पण त्यामुळे खाजगी वैद्यकीय व्यवसायातील लुबाडणूक, महागडे दर इ. वर काहीच प्रकाश पडत नाही. अर्थातच 'अशा लुबाडणुकीला विरोध केला पाहिजे' हे नंतर त्यांनीही म्हटले. मुख्य मुद्दा तो आहे असे त्यांना वाटत नसावे. नंतर त्यांनी 'डॉ. बाबा आमटे, डॉ. आरोळे दांपत्य इ.नी पददलित जनतेला वाचवण्याचे काम कसे केले आहे व त्यांचे अनुकरण विद्यार्थ्यांनी करायला हवे' असे आवाहन केले. आधुनिक वैद्यकीय शास्त्रामुळे रोगराई आटोक्यात यायला मदत झाली आहे, तसेच काही चांगले तर काही पूर्णतः सेवाभावी डॉक्टर्स आहेत हे डॉ. अनिल अवचट सारख्यांना अमान्य नाही; पण एकूण खाजगी डॉक्टरी व्यवसायात मोठ्या प्रमाणावर फसवणूक चालते, डॉक्टरांची फीही ते करत असलेल्या कामाच्या मानाने जास्त असते, आपली सामाजिक जबाबदारी डॉक्टर्स व्यवस्थितपणे पार पाडत नाहीत हा खरा मुद्दा आहे. इतर काही वक्त्यांप्रमाणेच डॉ. सतीश देसाई यांनीही या मुद्द्याला बगल दिली. म्हणून जरा आश्चर्य वाटले.

शेवटी अनिल अवचट बोलले, 'पेशंटस्च्या वतीने व काही चांगल्या डॉक्टर्सच्या वतीने भुंकणारा मी एक कुत्रा आहे' असा सरळ प्रतिटोला देऊन त्यांनी सुरुवात केली. इतर वक्त्यांचे सर्व प्रमुख आक्षेप एकामागून एक घेऊन त्यावर ते आपले म्हणणे मांडतील असे वाटले होते; पण तसे झाले नाही. काही आक्षेपांना त्यांनी उत्तरे दिली; पण 'छेद' ह्या त्यांच्या नवीन पुस्तकातील मुद्दे मांडण्यात त्यांनी वेळ खर्च केला. 'माझ्यावर विश्वास न ठेवता तुमच्याबद्दल पेशंटस् काय म्हणतात याचा तुम्ही स्वतः कानोसा घ्या. आमच्या टीकेचा स्वीकार करणे तुमच्याच फायद्याचे आहे. आहे हीच परिस्थिती चालू राहिली तर एके दिवशी सर्वसामान्य लोक तुम्हाला मारायला उठतील असा धोक्याचा कंदील तुम्हाला दाखवायचा आहे' असा इशारा त्यांनी दिला.

एक चांगला कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल संयोजकांचे अभिनंदन करायला हवे. मात्र डॉक्टरी व्यवसायातील गैरप्रकारापुरती चर्चा मर्यादित न रहाता एकूण वैद्यकीय शिक्षणाची व वैद्यकीय व्यवसायाची रचना, कार्यपद्धती, त्याला आधारभूत अशी मूल्ये यावरही व्यापक प्रमाणावर चर्चा व्हायला हवी व चांगल्या, पर्यायी रचनेचा विचार झाला पाहिजे.

—डॉ. अ. रा. फडके


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते?**
या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे

# सामाजिक चळवळीची पिछेहाट कां ?

रतनलाल भंडारी

१९७७ साली आपण दुसरे स्वातंत्र्य मिळविले. स्वातंत्र्याच्या या लोकशाही महाभारताला समग्र क्रांतीचा वारसा लाभलेला होता. त्यामुळे आपण या राज्यकर्त्यांमध्ये झालेल्या बदलाचा फायदा समतेची चळवळ गतिमान होण्यात होईल असे मानले होते; परंतु १९७७ मध्ये जनता-सरकार अधिकारावर आल्यावर समतेच्या चळवळीला गती मिळून ती परिवर्तनाचे हत्यार बनली नाही. याउलट समतेच्या संगरात अनेक क्षेत्रांत कार्यकर्त्यांना पराभवच पत्करावा लागला. याचे कारण कदाचित् नव्या शासकांकडून अपेक्षा ठेवण्यात चळवळीतील प्रवर्तकांनी स्वप्नाळूपणा दर्शविला होता यात आहे. या चळवळीशी संबंधित असणारे अनेकजण सत्तास्थानी आरूढ झाल्यामुळे ते या चळवळीत असताना त्यांनी केलेले कार्य, त्यांच्या घोषणा यांच्याशी ते प्रामाणिक राहून वाटचाल करतील अशी अपेक्षा होती; परंतु सत्तेचा पायगुण असा असतो, की ती नेहमी बहुमतवाल्यांबरोबर अथवा लोकशाहीतील गणित ज्यांच्यावर अवलंबून आहे अशा हातच्यांवर तडजोड करण्यास भाग पाडते. मुळातील समतेची जाणीव हळूहळू क्षीण होत जाते.

समग्र क्रांतीची कल्पना जयप्रकाशांनी ५ जून १९७४ रोजी प्रथम मांडली. सर्व क्षेत्रांत आमूलाग्र व आंतर–बाह्य परिवर्तन आणि व्यक्ती आणि संस्थांसह सामाजिक चौकटीतील बदल हे या क्रांतीचे साध्य होते. जे. पीं. च्या स्वप्नातला समाज हा शोषणमुक्त, जातिवर्गरहित असा समाज होता. परंतु समग्र क्रांतीच्या सुरुवातीलाच राजकीय लढ्याची राष्ट्रीय गरज निर्माण झाली आणि हळूहळू जे. पीं. च्या चळवळीतील समग्र क्रांतीचा अभिनिवेश मागे पडून तिला इंदिराविरोधाचे व अकार्यक्षम कॉंग्रेस शासनाला पदच्युत करण्याचे धोरण अपरिहार्यपणे स्वीकारावे लागले. चळवळीने पेट घेतला व राजकीय पक्षाने तिचे नेतृत्व बळकावले. त्यामुळे चळवळीतील आशयघनता कमी झाली. समग्र क्रांतीशी जे प्रामाणिक होते त्यांनी असा समज करून घेतला की, शासनात परिवर्तन झाल्यास समग्र क्रांतीची गंगोत्री शासनाच्या शंकराच्या जटेतून जन्मास येईल. अर्थातच हा स्वप्नाळूपणा एक दिवस तडा जाऊन शेख महंमदाच्या स्वप्नासारखा चक्काचूर होणारा होता.

या संदर्भात प्रचलित शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन करण्याचे मूलतः जे. पींचे ध्येय होते. शिक्षणक्षेत्रातील रचनात्मक कार्यक्रमाद्वारे रोजगारोपयोगी शिक्षणाची पुनर्रचना व्हावयाची होती. नोकऱ्या व बदल्या यांची फारकत करावयाचे ठरले होते; परंतु सुरुवातीचा अल्पकाळ सोडला तर क्रांति आंदोलनात या प्रश्नासंबंधी मुग्धताच अधिक होती आणि ती एका भव्य क्रांतीतून स्वार्थी आंदोलनात परिवर्तन करू इच्छिणाऱ्या राजकीय शक्तीच्या हिताची होती. त्यामुळे नंतरच्या राजवटीत शैक्षणिक प्रश्नासंबंधी कोणतेही मूलभूत परिवर्तन घडलेले दिसून येत नाही.

सुरुवातीला दलितांना, अल्पसंख्याकांना हुकुमशाहीच्या विनाशाबरोबर सुसह्य समाजजीवनाचा क्रांतिकारी कार्यक्रम मार्गदर्शक असल्याचे आश्वासन १९७७ च्या निवडणुकीत जनतेला दिले गेले होते. हुकुमशाहीचा पराभव हीच ऐतिहासिक कामगिरी १९७७ च्या क्रांतीने केली हे ऐतिहासिक सत्य आहे; परंतु परिवर्तनाच्या क्षेत्रात जे. पीं. चा पराभव झाला हेही ऐतिहासिक सत्य आहे. गेल्या तीन वर्षांच्या काळात शासन सामाजिक चौकटीतील बदलांच्या संदर्भात नुसतेच दिशाहीन राहिले नाही तर अनेक बाबतीत त्याने कोलांटया उड्या घेतल्या. या संदर्भात कोणतेही मराठवाड्यासारखे आंदोलन तपासून पाहिले असता प्रत्ययास येईल.

समता हे तसे निर्गुण तत्व आहे. त्याची सगुण, साकार प्रतिमा विविध प्रश्नांतून एकरूप होत असते. त्यामध्ये १. दलितांच्या उद्धारासाठी केलेले सामाजिक-आर्थिक प्रयत्न २. शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक दर्जाची ग्वाही व जीवनमानात वाढ ३. स्त्रीशक्तीला राष्ट्रीय जीवनात व समाजात कर्तृत्वाच्या संधी आणि सन्मान ४. कामगारांचे विशेषतः असंघटित कामगारवर्गाचे आर्थिक स्थैर्याचे लढे व संघटित कामगारशक्तींनी त्यांच्यासाठी केलेला त्याग ५. नोकऱ्यांमधील राखीव जागांचे प्रश्न ६. अल्पसंख्याकांना अभय व राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रवाहात त्यांचे विरघळणे ७. समान नागरी कायद्याबद्दल आग्रहीपणा ८. भ्रष्टाचाराविरुद्ध अभियान, या सर्वांचा समावेश होतो. या सर्व प्रश्नांच्या संदर्भात गेल्या तीन वर्षांत कोणतेही क्रांतिकारी परिवर्तन घडलेले नाही. एक जागृत प्रयत्न बिहारच्या कर्पूरी ठाकूर मंत्रिमंडळाने केला होता. राखीव जागांची संख्या ५०% पर्यंत वाढविण्याचे धोरण शेवटी आपल्याच पक्षातील विरोधकांमुळे ठाकूर मंत्रिमंडळाला नुसते सोडावे लागले नाही तर त्यांच्या पतनाचे तेही एक कारण होते. मराठवाड्यातील आंदोलनाच्या अंतरंगातही राखीव जागांविषयी असलेला बहुजनसमाजाचा व सवर्णांचा पेटता असंतोष दडलेला होता. सत्ता हाती आल्यावर राज्यकर्त्यांपैकी एका गटाला समतेचे काही किरकोळ आविष्कार कलंकासारखे धुऊन काढण्याची ऊर्मी होती. नाही तर विधानसभेच्या सार्वभौमत्वाचा लोकशाही डांगोरा पिटणाऱ्यांनी या आंदोलनात 'जैसे थे' भूमिका घेऊन योग्य वेळ येईपर्यंत थांबा असा विश्वामित्री पवित्रा घेतला नसता. अलीकडे जमशेटपूरच्या जातीय दंगली या समतेच्या वाटचालीतील पराभवाची जिवंत स्मारके नव्हेत काय ? धर्मस्वातंत्र्याचे बिल आणि त्याला लाभलेला शाही आशीर्वाद हे अल्पसंख्याकांना दिलेल्या आश्वासनाचे थडगे मानू नये काय ?

दलितसमाजावर झालेले हल्ले हे तर नव्या राजवटीच्या अगतिक असमर्थतेचे लक्षण

होते. ज्या वेळेस या हल्ल्यांच्या संदर्भात विधिमंडळात चर्चा घडून येई, त्या त्या वेळेस समग्र क्रांतीचे वारसदार पूर्वीच्या राजवटीत घडलेल्या नोंद-गुन्ह्यांचा आधार घेऊन तुलनात्मकरीत्या बोलत. त्या वेळस एक कातडीबचावू पवित्रा शासन घेत असल्याचे सातत्याने जाणवत होते. स्त्री-मुक्तीच्या संदर्भात नोकऱ्यांतील राखीव जागा आणि खुल्या जागांमधील ५०% जागा जिथे शक्य असेल तिथे स्त्रियांसाठी राखून ठेवाव्यात हे साधे तत्त्वही स्वीकारण्यात आले नाही. निव्वळ आर्थिक मुक्तीने सामाजिक मुक्ती मिळत नाही हे जरी खरे असले तरी आर्थिक विमोचन ही समतेची पहिली तुतारी असते हे ओळखले पाहिजे.

## चळवळीची पुढची दिशा

आज सामाजिक चळवळीत, समतेच्या चळवळीत विस्कळितपणा निर्माण झाला आहे. विशेषत: आजवर स्वातंत्र्योत्तर काळात या चळवळी साकार करणारे नेतृत्व कार्यकर्ते सत्तेच्या आत्मघातकी खेळात गुंतून पडल्यामुळे आज पोकळी निर्माण झाली आहे. राजकारण हे समतेच्या चळवळीला मारक आहे असे समजून त्यापासून फारकत करून घेणारा एक कार्यकर्त्यांचा वर्गही एकांडेपणाने 'या चळवळी एकारल्यासारख्या चालवीत आहे. लोकसमित्यांचा जे. पीं. ना अभिप्रेत प्रयोगही साकार झाला नाही. यासाठी समतेच्या चळवळीने पुढची वाटचाल कठीण परिस्थितीतून करावयाची आहे. त्यासाठी पुढील गोष्टी जर आपण करू शकलो तर समतेच्या चळवळीत खंबीरपणे पुनश्च 'हरि ॐ'चा करता येईल. प्रथम राष्ट्र-सेवादल, युक्रांद ग्रामायन, महात्मा फुले प्रतिष्ठान, विषमतानिर्मूलन समिती, मुस्लिम सत्यशोधक, बोहरी समाजातील पुरोगामी व्यक्ती व महाराष्ट्रात अनेक ठिकाणी काम करणाऱ्या सामाजिक संस्था यांनी एका व्यासपीठावर येऊन किमान कार्यक्रम तयार करावा. समग्र क्रांतीचे जे. पीं चे अपुरे कार्य पुरे करण्यासाठी क्रांतीचे स्वरूप स्पष्ट करणारा एक आराखडा तयार व्हावयास पाहिजे. या संदर्भात कै. आप्पासाहेब पटवर्धन यांनी आपल्या चलनशुद्धीच्या चळवळीच्या पुरस्कारार्थ ज्याप्रमाणे समाजातील प्रत्येक घटकाचे स्थान निश्चित करणारे विचार स्पष्ट केले होते, त्याप्रमाणे समग्र क्रांतीची मनुस्मृती तयार करण्याची आवश्यकता आहे. कारण क्रांतीनंतर समाजातील प्रत्येक घटकाचे स्थान व कार्य निश्चित झाल्याशिवाय क्रांतीसंबंधीचे विचार जे. पीं. प्रमाणे अस्पष्ट व धूसर राहण्याचा धोका आहे. ही नवी मनुस्मृती तयार करताना ती बरीचशी स्वप्नाळू राहण्याचा धोका पत्करूनही तिची समतेचे परिवर्तन घडविण्यासाठी आवश्यकता आहे.

समतेचा लढा वर्ग व वर्ण यांच्या समन्वयातून साकार होणार आहे. वृत्तपत्रांच्या माध्यमातून या लढ्याची तळी उचलली जाईल, असा भ्रम ठेवण्यात फारसा अर्थ नाही. कारण प्रस्थापितांचा पुरस्कार हा प्रसार-माध्यमांचा स्थायी गुण असतो. त्यातून समतेचे बहुसंख्यांक लढे हे बहुमतवाल्यांच्या विरुद्ध लढावे लागतात. म्हणून व्यक्तिमत्त्व-प्रसार आणि प्रचार याचा अनुनय करणारी सर्वोदयी, मिशनरी वृत्ती धारण करणारे कार्यकर्त्यांचे मोहोळ देशभर उठवावे लागेल. शिक्षण आणि कायदे हे नेहमी समतेच्या सामाजिक चळवळींच्या प्रसाराचे अभिन्न अंग आहेत. या दोन्ही माध्यमांचा कुशल वापर करण्यासाठी आपणाला प्रयत्न करावे लागतील.

आज समतेची चळवळ राजकीय वादळी परिस्थितीत मरगळल्यासारखी झाली असताना स्थितीवादी पक्षांशी काडीमोड व क्रांतिवादी राजकीय पक्षांशी भ्रातृभावाचे नाते हे सामाजिक चळवळीचे लक्ष्य असले पाहिजे. नाही तर प्रत्येक क्रांतीनंतर जो ऐतिहासिक संधिकाल असतो तो वाढत जाऊन कदाचित् फ्रेंच राज्यक्रांतीनंतर नेपोलियनच्या हुकुमशाहीचे स्वागत करणारा ऐतिहासिक क्षण आला, तो येण्याचा भारतातही धोका आहे.

याचा अर्थ असा नव्हे, की गेल्या अडीच वर्षांत समतेचे लढे लढविले गेलेच नाहीत. जे लढविले गेले ते फुटकळ स्वरूपाचे होते आणि कार्यकर्त्यांची ताकद समतेच्या चळवळीची पुनर्बांधणी करण्यासाठी खर्च होत होती. महाराष्ट्रातील काही सुशिक्षित व्यक्ती सुसंस्कृत मने वर्गनिरपेक्ष, वर्णनिरपेक्षविचार व आचरण करीत असतात; परंतु आपले सामुदायिक मानस मात्र जातीयवादी, वर्गवादी विचार प्रकर्षाने करते असे जाणवल्याशिवाय राहात नाही. □


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | **कामसूत्रकार वात्स्यायन** – (जगातील पहिल्या कामशास्त्र्याच्या जीवनावरील कादंबरी) – दि. बा. मोकाशी | रु. २५/– |
| २. | **पण थोडक्यात निभावलं** – जेम्स हॅडले चेस – अनुवाद – विजय देवधर | रु. १२/– |
| ३. | **ताळमेळ** – (विनोदी कथासंग्रह) – रा. रं. बोराडे | रु. ४.५० |
| ४. | **दुहाई** – (कादंबरी) – चंद्रप्रभा जोगळेकर | रु. १५/– |
| ५. | **बावला** – (कादंबरी) – उद्धव ज. शेळके | रु. १५/– |

**ENGLISH**

| | | |
|---|---|---|
| 1. | **Shall We Tell the President ?** Political thriller about the plot to murder Edward kennedy)–Jeffrey Archer. | Rs. 12·70 |
| 2. | **A Stranger Is Watching** – (Thriller – Soon to be a major motion picture) – Mary Higgins clark. | Rs. 14·35 |
| 3. | **Yargo** – (Bestsller – Novel) – Jaequeline Susann | Rs. 22/– |

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

# राष्ट्रपतिपद

## टीकेच्या गदारोळात तथ्य किती ?

वा. दा. रानडे

जगजीवनरामांना सरकार बनविण्याची संधी न देता लोकसभा बरखास्त करणे आणि निवडणुकीपर्यंतच्या तीन-साडेतीन महिन्यांच्या काळात चरणसिग सरकारलाच काळजीवाहू सरकार म्हणून कारभार पहायला सांगणे या राष्ट्रपतींच्या निर्णयावर जनता पक्षाच्या नेत्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करावी हे स्वाभाविक होते; पण ती नुसतीच तीव्र नसून अतिरेकी आहे. राष्ट्रपतींनी कट केला, विश्वासघात केला, ते खोटेपणाने वागले असे आरोप त्यांच्याविरुद्ध करण्यात आले असून त्यांच्या चौकशीचा (इंपीचमेंट) ठराव राज्यसभेत आम्ही मांडणार आहोत असे जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यांनी सांगितले. या आरोपांमध्ये व टीकेमध्ये तथ्य किती? याचा विचार पक्षीय दृष्टिकोनातून न करता वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून करायला हवा.

या बाबतीत एक अडचण म्हणजे राष्ट्रपतींचा निर्णय केवळ हुकमाच्या किंवा आदेशाच्या स्वरूपात प्रसिद्ध झालेला आहे. या निर्णयामागची त्यांची कारणमीमांसा, परिस्थितीचे विश्लेषण लोकांपुढे आलेले नाही. त्यांनी यासंबंधात सविस्तर निवेदनच प्रसिद्ध करायला हवे होते किंवा आकाशवाणीवर भाषण करायला हवे होते, त्यामुळे बरेच गैरसमज दूर झाले असते. राष्ट्रपतींची अशी निवेदने किंवा भाषणे करण्याची प्रथा नाही हे खरे; पण असाधारण परिस्थितीत या मार्गाचा अवलंब करायला हवा. एखाद्या महत्त्वाच्या विषयासंबंधी किंवा बिलासंबंधी आवश्यक वाटल्यास संसदेपुढे भाषण करण्याचा किंवा संदेश पाठविण्याचा अधिकार घटनेने त्यांना दिलेला आहे; पण आतापर्यन्तच्या एकाही राष्ट्रपतींनी या अधिकाराचा वापर केलेला नाही. सध्यासारख्या पेचप्रसंगात अशा अधिकाराचा वापर करावयाचा नाही, तर तो अधिकार आहे कशासाठी? असा प्रश्न मनात येतो.

सध्याचा पेचप्रसंग टाळण्यासाठी राष्ट्रपती संजीव रेड्डी आणि मोरारजीभाई देसाई यांना विचारविनिमय करून एकमताने काही मार्ग काढता आला नसता का? मंत्रिमंडळाचा निर्णय राष्ट्रपतींनी मानला पाहिजे, फार तर एखाद्या निर्णयाचा फेरविचार करावा असे राष्ट्रपती सांगू शकतात अशी घटनेत तरतूद आहे. निर्णय मंत्रिमंडळानेच घ्यावयाचे हे खरे; राष्ट्रपतींवर ते बंधनकारक आहेत हेही खरे; पण महत्त्वाचे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत राष्ट्रपतींचाही सहभाग हवा. पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्यात महत्त्वाच्या प्रश्नावर विचारविनिमय होऊन शक्यतो एकमताने निर्णय व्हावेत. सध्याच्या पेचप्रसंगाचे मूळ पक्षांतर. राष्ट्रपती आणि मोरारजीभाई यांच्यात पक्षांतरबंदीसाठी तातडीने काय करता येईल, यावर काही विचारविनिमय झाला होता का? पक्षांतरबंदीचा वटहुकूम पंतप्रधानांच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींनी काढला असता तर पेचप्रसंग सुटण्यास मदत झाली नसती का? पक्षांतराने मोरारजीभाईंचे सरकार पाडण्याचा बनाव काही अचानक झालेला नाही. त्याची योजना राजनारायण यांनी आधीपासून आखली असली पाहिजे. त्याची कल्पना मोरारजीभाईंना नव्हती की काही थोडे लोक फुटले तरी सरकारला धोका नाही असे वाटून त्यांनी तिकडे दुर्लक्ष केले? अधिवेशन चालू असताना राष्ट्रपतींना वटहुकूम काढता येत नाही. तेव्हा अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच पक्षांतरबंदीचा वटहुकूम काढला गेला असता तर पेचप्रसंग टळण्याची शक्यता होती. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी भाषण किंवा संदेशाच्या रूपाने राष्ट्रपतींनी आपले विचार मांडले असते आणि पक्षांतर करणारांनी लोकसभेतील आपल्या जागांचा राजीनामा देण्याचा उच्च पायंडा पाडावा असे आवाहन केले असते तर पक्षांतर काही प्रमाणात रोखले गेले असते; पण पक्षांतरातून सरकार कोसळणार आहे याची आधी कल्पना नसल्याने पंतप्रधान व राष्ट्रपती यांनी याबाबत काही केले नाही.

मोरारजी-मंत्रिमंडळाच्या राजिनाम्यानंतर पर्यायी सरकारच्या स्थापनेबाबत निर्णय घेतानाही पक्षांतराच्या प्रश्नावर ठाम भूमिका राष्ट्रपतींनी घेतली नाही. फाटाफुटीतून एकत्र आलेले गट स्थिर सरकार देऊ शकणार नाहीत हे स्पष्ट दिसत असताना चरणसिंगांना सरकार बनविण्याची संधीच त्यांनी द्यावयास नको होती आणि त्याच वेळी लोकसभा बरखास्त करून निवडणुका जाहीर करावयास हव्या होत्या; पण बहुसंख्य खासदारांना निवडणुका नको होत्या; तेव्हा त्यांचा रोष कशाला ओढवून घ्या, असा विचार राष्ट्रपतींनी केला असणे शक्य आहे. मुदतपूर्व निवडणुका हा शेवटचा मार्ग. त्यापूर्वी पर्यायी सरकार स्थापण्याचे सर्व प्रयत्न अजमावून पहायला हवेत, असे मत काही घटनापंडितांनी व्यक्त केलेले होते. ते मत ग्राह्य मानून त्यांनी चरणसिंगांना संधी दिली असे मानले तर चरणसिंगांच्या राजिनाम्यानंतर जगजीवनरामांना तशीच संधी देऊन राष्ट्रपतींनी चक्र पुरे का होऊ दिले नाही? चव्हाणांना, चरणसिंगांना संधी द्यावयाची आणि जगजीवनरामांना ती नाकारावयाची यात उघड अन्याय होता. आधी सरकार जनता पक्षाचेच होते. त्याने बहुमत गमावल्यावर राजीनामा दिला तेव्हा केवळ नेता बदलला म्हणून त्या पक्षास पुन्हा संधी कशासाठी द्यावयाची? असा युक्तिवाद राष्ट्रपतींच्या निर्णयाचे समर्थक करतात. त्यात काही प्रमाणात तथ्य असले तरी नवा नेता आणखी काही गटांचा पाठिंबा मिळवू शकतो. पक्षबळात फरक पडू शकतो म्हणून त्याला संधी द्यायला हवी. तसेच जनता पक्षाला पुन्हा सरकार बनविण्याची संधी द्यावयाचीच नाही अशी काही राष्ट्रपतींची ठाम भूमिका नव्हती. तसे असते तर त्यांनी चरणसिंगांच्याबरोबर मोरारजीभाईंना आपल्या समर्थकांची यादी सादर करायला सांगितलीच नसती. चरणसिंगांच्या राजिनाम्यानंतर मोरारजींच्या जागी निवडल्या

गेलेल्या जनता पक्षाच्या नव्या नेत्याला म्हणजेच जगजीवनरामांना ही संधी मिळायला हवी होती.

दुसरा प्रश्न राष्ट्रपतींच्या अधिकारांचा उपस्थित करण्यात आला आहे. पंतप्रधानांचा सल्ला राष्ट्रपतींनी मानला पाहिजे, अशी घटनेत तरतूद आहे. याचा आधार घेऊन लोकसभा बरखास्त करण्याचा चरणसिंगांचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक आहे असा युक्तिवाद करण्यात आला; पण घटनेतील कलमांचा अर्थ लावताना नुसत्या शब्दापेक्षा त्यामागील उद्देश लक्षात घ्यावयास हवा. पंतप्रधानांचा सल्ला याचा अर्थ लोकसभेत बहुमताचा पाठिंबा असलेल्या पतप्रधानांचा सल्ला असाच घ्यावयास हवा. चरणसिंग मंत्रिमंडळाने लोकसभेतील विश्वासाच्या ठरावाला सामोरे न जाता राजीनामा दिला याचाच अर्थ त्यांच्यामागे बहुमत राहिले नव्हते. अशा पंतप्रधानाचा सल्ला राष्ट्रपतीवर बंधनकारक कसा होऊ शकतो ?

निवडणुकीपर्यंतच्या तीन–साडेतीन महिन्यांच्या काळासाठी सध्याचे चरणसिंग सरकार चालू ठेवण्याचा राष्ट्रपतींचा निर्णयही योग्य नाही. आपण धोरणविषयक महत्त्वाचे निर्णय घेणार नाही असे आश्वासन चरणसिंगांनी दिले आहे; पण या काळात महत्त्वाचे निर्णय घेण्याची वेळ आली तर ते कसे टाळता येतील ? भाववाढीचाच प्रश्न घ्या. गोड्या तेलाचे भाव आटोक्याबाहेर गेले. त्याला आळा घालण्यासाठी सरकारने उपाय योजायला नको का ? आणि काही परिणामकारक उपाय चरणसिंग सरकारने योजले असे गृहीत धरले तर त्याचा फायदा त्यांच्या पक्षाला निवडणुकीत मिळू देणे कितपत योग्य? सर्वपक्षीय राष्ट्रीय सरकार नेमण्याबाबत चर्चा झाली होती; पण त्यावर एकमत झाले नाही. राष्ट्रपतींना आपल्या अधिकारात दुसरे सरकार स्थापन करता आले नसते का ? पंतप्रधान म्हणून ते कोणाचीही निवड करू शकतात. तो संसदेचा सभासद असलाच पाहिजे अशी अट नाही. अशीच तरतूद त्यांनी निवडलेल्या मंत्र्यांबाबतही आहे. मंत्र्यांनी सहा महिन्यांच्या आत लोकसभेवर किंवा राज्यसभेवर निवडून आले पाहिजे एवढीच अट घटनेत आहे. त्याचा फायदा घेऊन राष्ट्रपतींना राजकीय पक्षांबाहेरच्या व्यक्तींचे मंत्रिमंडळ नेमता आले असते. हा प्रयोग त्यांनी करून पहायला हवा होता.

राष्ट्रपतींनी पंतप्रधान निवडण्याची सध्याची जी पद्धत आहे त्यापेक्षा काही निराळा मार्ग काढता येणार नाही का, याचाही विचार सध्याच्या पेचप्रसंगाच्या अनुषंगाने राजकीय पक्षांच्या नेत्यांनी व घटनातज्ज्ञांनी करायला हवा. पंतप्रधानांची निवड लोकसभा-सभासदांवरच सोपवायला काय हरकत आहे ? निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर लोकसभेची बैठक बोलावून खासदारांनीच गुप्त मतदानाने, बहुमताने पंतप्रधानांची निवड करावी. एखाद्या मंत्रिमंडळाने राजीनामा दिल्यावर नवा पंतप्रधान अशाच पद्धतीने निवडला जावा. घटनेत त्यासाठी दुरुस्ती करावी लागेल; पण प्रमुख राजकीय पक्षांचे एकमत होऊ शकले तर काही अडचण येणार नाही. हा मार्ग अवलंबिला तर राष्ट्रपतींवर जो टीकेचा गदारोळ उठला तसे प्रसंग येणार नाहीत.

पालखीवाला यांनी म्हटल्याप्रमाणे राष्ट्रपतींकडून घटनात्मक अनौचित्य झाले; पण त्यांची चौकशी केली जावी असा घटनाभंगाचा गंभीर गुन्हा त्यांच्या हातून झाला आहे असे म्हणता येणार नाही. त्यांचे वर्तन त्या पदाच्या प्रतिष्ठेस शोभेसे झाले नाही, हेही मान्य करायला हवे. मोरारजीभाईंनी यादी सादर करण्यासाठी चोवीस तासांची मुदत मागितली होती. राष्ट्रपतींनी ती प्रथम देण्याची तयारी दर्शवून मग निर्णय का बदलला ? जगजीवनराम व चंद्रशेखर यांना यादी सादर करण्यास सांगितले आणि त्यांची यादी येण्यापूर्वीच लोकसभा-बरखास्तीचा निर्णय जाहीर केला. हे नेते जे सांगत आहेत ते बरोबर नसेल तर राष्ट्रपतींनी आपली बाजू निवेदन काढून स्पष्ट करायला हवी होती.

घडलेल्या घटनांचा जनता पक्षाच्या नेत्यांनीही अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. चरणसिंग-गटाने पक्षांतर करून जनता पक्ष फोडला. पक्षांतराबरोबर त्यांनी लोकसभेतील आपल्या जागांचा राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी जनता पक्षाचे नेते करीत आहेत; पण हाच न्याय दुसऱ्या पक्षातील पक्षांतरास लावायला त्यांची तयारी नाही. जगजीवनराम यांनी काँग्रेस पक्षात फाटाफूट घडवून आणून आपले बहुमत करण्याचा प्रयत्न केला तो कितपत योग्य होता ? पक्षांतर मग ते कोठेही घडो सारखेच त्याज्य व निषेधार्ह मानायला हवे. आपले सरकार बनले नाही तरी चालेल; पण दुसऱ्या पक्षाचे सभासद फोडून मिळालेला पाठिंबा नको अशी भूमिका जगजीवनराम यांनीही घेतली नाही आणि ती त्यांनी घ्यावी असा आग्रह कोणी धरलाही नाही.

संसदीय लोकशाही पद्धतीऐवजी फ्रान्सच्या धर्तीची अध्यक्षीय पद्धती आपण स्वीकारावी अशी सूचना पालखीवाला यांनी केली आहे. दहा वर्षांपूर्वी इंदिरा गांधींनी काँग्रेसमध्ये प्रथम फूट पाडली त्या वेळी अध्यक्षीय पद्धतीबद्दल अनुकूलता दर्शवणारा एक लेख मी लिहिला होता; पण निक्सनच्या राजवटीतील वॉटरगेट प्रकरण आणि अध्यक्षीय लोकशाहीचा बांगला देशामधील अनुभव लक्षात घेता या पद्धतीने आपले प्रश्न सुटतील असे वाटत नाही. उलट एखादा महत्त्वाकांक्षी नेता त्यातून हुकुमशाही आणण्याचा धोका आहे. संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही या दोन्ही पद्धतींचे यश अखेर त्या पद्धती राबविणाऱ्या व्यक्तींवर अवलंबून आहे आणि सत्ता माणसाला भ्रष्ट करते हे जाणून सत्ताधाऱ्यांवर सर्वसामान्य नागरिकास अंकुश ठेवता यावा यासाठी जयप्रकाशांनी सुचविलेल्या लोकसमित्यांच्या मार्गाकडेच आपणास वळायला हवे; पण लोकसमित्या खऱ्या अर्थाने संघटित करण्याबद्दल फारशी कोणाला आस्था असल्याचे दिसत नाही.

□

अफगाणिस्थान....
लेखांक तिसरा

# “ तुझ्या पायाला लागलेली मायदेशाची धूळ माझ्या घरात येऊ दे....” —एक होती राणी

(उत्तरार्ध)

लेखिका : प्रतिभा रानडे, काबूल

अफगाणिस्थानातलं राजकारण हे टोळीवाल्यांचं राजकारण आहे. अत्यंत हुषार, डावपेचात मुरलेला, आपल्या लोकांसाठी वाटेल तो धोका पत्करायची तयारी असलेला, वगैरे गुण असलेल्या माणसाकडे टोळीचे नेतृत्व आपोआपच जाते. अमानुल्लामध्ये हे गुण होतेच. शिवाय त्याचं वागणं-बोलणं अतिशय आकर्षक, लोकांना जिंकून घेणारं होतं. आपल्या लोकांसाठी चांगलं काही करण्याची त्याची आणि सरय्याची तळमळ एवढी तीव्र होती की, जुन्या विचारांच्या लोकांना विशेषतः मुल्लामौलवींना त्याच्या सुधारणा पसंत नव्हत्या, तरी त्यांच्या तळमळीबद्दल त्यांच्या हेतूंबद्दल कोणाच्याही मनात शंका नव्हती. हरून-अल्-रशीदप्रमाणे अमानुल्ला हासुद्धा वेष बदलून बाजारातून हिंडायचा. सामान्य लोकांमध्ये वावरायचा, जनमानसाचा कानोसा घ्यायचा. लोकांच्या तक्रारी ऐकून, दूर करायचा. पूर्वी अमीर आणि सामान्य लोक यांच्यामध्ये प्रत्यक्ष अल्ला आणि सामान्य लोक एवढं अंतर मुद्दामहूनच ठेवलं जात होतं. ते अंतर अमानुल्लानं अगदीच कमी करून टाकलं. ‘आमच्यासाठी आमचा अमीर काही तरी करतो आहे’, या भावनेमुळे तो लोकांचा लाडका अमीर होता.

जगाच्या राजकारणात त्यानं अफगाणिस्थानचं स्थान केवढं तरी उंचावलं तिसऱ्या अँग्लो-अफगाण युद्धाच्या विजयानंतर भारतातील ब्रिटिश सरकारशी बोलणी करून अमानुल्लानं, अफगाणिस्थानला प्रथमच आपली परराष्ट्रनीती आपणच हाताळण्याचं स्वातंत्र्य मिळवलं. हा फार मोठा विजय होता. आतापर्यंत व्हाइसरॉयच्या सांगण्याप्रमाणेच अफगाणिस्थानच्या अमीराला इतर देशांशी संबंध ठेवावे लागत होते. ब्रिटिश वर्चस्व झुगारून देऊन अमानुल्लानं रशिया, जर्मनी, इराणशी स्वतंत्रपणे आपल्याला फायदेशीर असे संबंध वाढवायला सुरुवात केली. त्याचा मुस्लिम जगामध्ये एवढा चांगला परिणाम झाला की, तुर्कस्थानचा खलिफा गेल्यानंतर, अमानुल्लानेच खलिफा व्हावे अशी सगळ्या मुस्लिम जगाने इच्छा प्रगट केली होती. अमानुल्ला अर्थातच फार खुश झाला; पण एवढ्यातच त्याची तयारी नव्हती आणि शिवाय त्याच वेळी खिलाफत प्रकरण सुरू होऊन सगळंच चित्र बदललं.

पहिल्या महायुद्धानंतर हळूहळू मुस्लिमजगामध्ये सामाजिक सुधारणांविरुद्धचा पूर्वीचा कडवटपणाही गेला होता. अमानुल्ला हाच आपल्याला उद्याच्या नवीन जगाकडे घेऊन जाणारा तारणकर्ता आहे अशी सर्वसाधारणपणे भावना निर्माण होऊ लागली त्यामुळं त्याच्या आधुनिकीकरणाकडेही लोक कौतुकानं पाहू लागले. अमानुल्ला लोकप्रियतेच्या कळसावर पोचला होता. अशा वेळी त्यानं युरोपचा दौरा काढला. स्वतंत्र, सार्वभौम अफगाणिस्थानचं अस्तित्व युरोपिअन राष्ट्रांच्या मनावर ठसवण्याचा त्याचा हेतू होता. त्या वेळच्या भारतातील ब्रिटिश सरकारने त्यामध्ये मोडता घालायचा प्रयत्न केलाच; तरी पण त्यांनाही शेवटी हार तर मानावी लागलीच; पण शिवाय अमानुल्ला—सरय्या यांच्या शाही स्वाऱ्या जेव्हा हिंदुस्थानातून प्रवास करीत होत्या, तेव्हा त्यांची अत्युत्कृष्ट बडदासी ब्रिटिश सरकारनं ठेवली होती.

व्हाइसरॉयची इच्छा होती की, अमानुल्लानं दिल्लीला येऊन व्हाइसरॉयची प्रत्यक्ष गाठ घ्यावी; पण अमानुल्ला दिल्लीला गेला नाही. तो म्हणाला, ‘ब्रिटिश सरकारशी संबंध ठेवायचे तर मी इंग्लंडच्या राजाशीच संबंध ठेवीन. बरोबरीच्या नात्यानं व्हाइसरॉय कोण? तोही इंग्लंडच्या राजाचा एक तऱ्हेचा पगारी नोकर!’

अमानुल्ला—सरय्या मुंबईला आल्यावर त्यांचे महाप्रचंड उत्स्फूर्त स्वागत मुंबईच्या लोकांनी केलं. एक तर दिल्लीला जाण्याबाबतचं अमानुल्लाचं मत लोकांना फार आवडलं होतं. शिवाय, जालियनवालाचं हत्याकांड झाल्यानंतर अमानुल्लानं काबूलमध्ये दुसऱ्याच दिवशी जाहीर सभा घेऊन, जालियनवालाची हकीगत लोकांना वाचून दाखवली होती. (त्या वेळी त्याच्या डोळ्यांतून पाणी येत होतं!) आणि असे अत्याचार करणाऱ्या ब्रिटिशांविरुद्ध लोकांना त्यानं भडकावले होते. त्याच वेळी हिंदुस्थातले लोक हे आमचे मित्र आहेत, त्यांच्यासाठी काहीही करण्याची तयारी त्याने दाखवली होती. त्यामुळेही अमानुल्ला इथल्या लोकांना आवडत होता. भारतीय मुसलमान अमानुल्लाकडे आपला नेता म्हणून पहात होते, तसेच

भारतीय हिंदूंनाही अमानुल्लाच्या सामाजिक सुधारणांमुळं, त्याच्या ब्रिटिश द्वेषामुळं तो आवडत होता. त्याला पहाण्यासाठी, त्याच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी–दर वेळी, प्रत्येक ठिकाणी एवढी गर्दी व्हायची की, ब्रिटिशांची अवस्था मोठी चमत्कारिक झाली. एका सभेमध्ये अमानुल्लानं गर्दीतल्या एका हिंदू माणसाला व एका मुसलमान माणसाला व्यासपीठावर बोलावून घेतले. त्यांचे हात एकमेकांच्या हातात दिले आणि, 'हिंदुस्थानातले हिंदूमुसलमान जर बंधुत्वाने राहिले तर मला सर्वांत जास्त आनंद होईल! भारतीय हिंदू माझे शेजारी आहेत तसेच ते माझे भाऊही आहेत!' असं जाहीरपणे सांगितलं. कस्तुरबा गांधींना (गांधीजी त्या वेळी तुरुंगात होते) अमानुल्ला आणि सरय्या रेल्वेस्टेशनवर भेटले, त्या वेळी अक्षरशः मुंगी दिसायला जागा नाही अशी गर्दी झाली होती! अमानुल्ला, सरय्या यांच्या या प्रचंड लोकप्रियतेची चांगलीच खूणगाठ ब्रिटिश सरकारनं मात्र बांधून ठेवली!

मुंबईकरांचा निरोप घेऊन, शाही स्वाऱ्या 'राजपुताना' बोटीवरून निघाल्या त्या वेळी, परक्या लोकात वावरताना सरय्यानं प्रथमच आपल्या चेहऱ्यावरचाही बुरखा काढून टाकला आणि उजळमाथ्यानं तिनं युरोपच्या प्रवासाची सुरुवात केली.

मुंबईनंतर शाहीस्वाऱ्यांचा पहिला मुक्काम होता पोर्टसैद! अमानुल्लाबरोबर त्याची लाडकी बहीण नूर-उस्-सिराज हीसुद्धा होती पोर्टसैदला उतरण्याच्या अगोदर सरय्या, नूर-उस-सिराज आणि अमानुल्ला यांच्यामध्ये बरीच चर्चा झाली. पोर्टसैदला उतरताना बुरखा घालायचा की नाही? सरय्या, नूर-उस्-सिराजने पुन्हा एकदा बुरखा घालावा ही कल्पनाही कुणालाच सहन होत नव्हती!

'पण हा प्रश्न इथं, पोर्टसैदला आपण उतरणार आहोत, म्हणूनच जरा नाजूक झाला आहे. इजिप्त हे मुसलमान राष्ट्र आहे. अत्यंत मागासलेलं आहे. इथं जर तुम्ही बुरखा न घालता वावरलात तर त्याचे पडसाद फार दूरवर पोचतील. कदाचित इजिप्त, इराण, इराक, तुर्कस्तान, सौदीअरेबिया सगळ्याच मुस्लिम राष्ट्रांतून संतापाची लाट उसळेल काय? एक मुस्लिम राणी बुरखा न घालता वावरते आहे हे त्यांना सहन होईल? पण सुरुवातीपासून मी सतत बुरख्याविरुद्ध, पडद्याविरुद्ध बोलत असताना, माझ्या बायकोला, माझ्या बहिणीलाच मी बुरख्यात ठेवलं तर सगळं जग मला हसणार नाही का? काय करावं?' अमानुल्ला स्वतःशीच बोलल्यासारखा बोलत होता.

'प्रश्न नाजुक आहे म्हणून त्याचं उत्तरसुद्धा चातुर्यानं हळूवारपणानंच काढलं पाहिजे!' सरय्या म्हणाली.

'ते तर आहेच; पण शेवटी आपण काहीही मार्ग काढला तरीसुद्धा काही लोक नाराज होणार, काही लोक नावं ठेवणार हे गृहीतच धरलं पाहिजे. एकाच वेळी सगळ्यांनाच पसंत पडेल असं कधीच काही होत नाही.' नूर-उस-सिराजनं आपलंही मत सांगितलं.

'अगदी बरोबर आहे; पण त्यांनाही शेवटी आपल्या मनाला पटेल ते, आपल्या कार्याशी, मतांशी सुसंगत असेल ते आणि अंतिम शहाणपणाचं ठरेल अशी खात्री असेल, तोच मार्ग शोधून काढला पाहिजे.' सरय्या म्हणाली.

अमानुल्ला म्हणाला, 'या वेळी आता मला, माझ्या कारभाराच्या सुरुवातीच्या दिवसांची आठवण येत आहे. त्या वेळी मी वेठबिगारी, गुलामी कायद्यानं बंद केली म्हणून पठाण टोळीवाले माझ्यावर रागावले होते. हजारो टोळीवाल्यांना पिढ्यान्‌पिढ्या गुलाम म्हणून वापरायची त्यांची मिरासदारी मी काढून घेतली म्हणून ते नाराज झाले; पण त्या माझ्या कायद्यामुळं हजारो लोक संपूर्णपणे कायमचे माझ्या अंकित झाले आहेत. त्यांच्यावर कोणत्याही परिस्थितीमध्ये विसंबून रहाता येईल एवढी माझी खात्री आहे. त्यांच्यामुळंच तर खोस्तवंड मी मोडून काढू शकलो....'

'आपण असं केलं तर?' सरय्या एकदम काही तरी आठवल्यासारखी, उत्साहानं मध्येच म्हणाली, 'आम्ही फक्त हॅटला लावलेलाच बुरखा घालू. तोसुद्धा अत्यंत तलम कापडाचा. म्हणजे मग बुरखा घातला म्हणून मुसलमानाना तक्रारीला जागा रहायची नाही आणि इतका नाममात्र बुरखा घातला म्हणून इतर लोक चेष्टाही करायचे नाहीत!'

'ठीक आहे. कल्पना चांगली आहे. कोणचं कापड वापरायचं मग बुरख्यासाठी?' अमानुल्ला लगेच कामालाच लागला.

आणि मग बोटीवरून पोर्टसैद बंदरावर उतरताना, सरय्यानं आणि नूर-उस-सिराजनं हॅटला लावलेले, फक्त चेहऱ्यावरूनच येणारे बुरखे घातले होते–अत्यंत झिरझिरीत, रेश्मी काळ्याभोर कापडाचे. शाही स्वागतासाठी–किनाऱ्यावर आलेल्या इजिप्शियन मुस्लिमांना अतिशय आश्चर्य वाटले; पण कोणीही त्याबद्दल बोललं नाही. मात्र फोटोग्राफर्सनी फटाफट फोटो घेतले. वृत्तपत्रात छापून आलेले सरय्याचे ते फोटो युरोपभर गेले. अफगाणिस्थानातल्या खेडेगावांतून गेले नाहीत, फक्त काबूल, कंदाहारला गेले, झिरझिरीत, रेशमी, काळ्याभोर पडद्याआडचा सरय्याचा गोरापान, सुंदर, वावरलेला चेहरा स्पष्ट दिसत होता. युरोपमधल्या बायकांना हा असा पडदा – चेहऱ्यावद्दलची उत्सुकता वाढवणारा, अतिशय आवडला. एक नवीनच फॅशन म्हणून काबूल-कंदाहारच्या लोकांनी फोटो पाहून निश्वास सोडला. सरय्याला नेहमीच अशा बुरख्यात त्यांनी पाहिलं होतं. तरी पण तेव्हा तिचा चेहरा असा दिसायचा नाही. असं असूनही जिथं जातील तिथं त्यांच्या राजाराणींचं केवढं तरी भव्य स्वागत होत होतं. त्याचं कौतुक त्यांना वाटत होतं. त्यांचा चिमुकला मागासलेला देश, अमानुल्ला-सरय्याने जगाच्या भव्य नकाशावर नेऊन ठेवला होता, ते ऋण त्यांना मान्य होतंच.

## रोम, पॅरिस, लंडन

रोम रेल्वेस्टेशनावर इटालीचा राजा व्हिट्टोरियो इमॅन्युअल, त्याची राणी आणि बोनिटो मुसोलिनी, अमानुल्ला-सरय्याच्या स्वागतासाठी आले होते. व्हिट्टोरियोने लालबुंद गुलाबाचा खूप मोठा गुच्छ देऊन सरय्याचे स्वागत केले, स्वागतसमारंभ झाल्यावर मुसोलिनी, बाजूच्या एका आडदाराने पाठीमागच्या गल्लीत ठेवलेल्या बुलेटप्रूफ काचा लावलेल्या गाडीत बसून, कुणालाही नकळत निघून गेला. इटलीचे राजाराणी आणि अमानुल्ला-सरय्या हे चौघे मात्र एका उघड्या गाडीतून रोमच्या राजरस्त्यांवरून, स्वागताच्या घोषणा देणाऱ्या दुतर्फा जमलेल्या गर्दीतून मिरवीत गेले. सरय्याने पोर्टसैदला घातलेला चेहऱ्यावरचा तो झिरझिरीत पडदाही आता

काढून टाकला होता. राणीने दिलेला तो गुलाबपुष्पांचा गुच्छ एका हातात धरून, दुसरा हात लोकांकडे पहात हलवीत, सरय्या एखाद्या सुधारलेल्या पाश्चात्य देशातल्यां राणीसारखी मिरवीत जात होती !

आतापासून ब्रिटिशांनी आपले काही खास फोटोग्राफर, फक्त सरय्याचे फोटो घेण्यासाठी, शाही स्वारीबरोबर पाठवायला सुरुवात केली. त्यांचे काम एवढेच की, वेगवेगळया ठिकाणी, वेगवेगळया वेशातले, सरय्याचे जेवढे जमतील तेवढे फोटो काढून ब्रिटिश सरकारच्या परराष्ट्रखात्याकडे पाठवायचे !

याच वेळी अमानुल्ला आणि इमॅन्युएलची अतिशय गाढ मैत्री झाली. ते दोघे आपापल्या बायकांबरोबर एकमेकांना मेजवान्या देत, रोम भोवतींच्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी द्यायला जात, शिकारीला जात, हंसणं, खेळणं, एकमेकांची चेष्टामस्करी ... कुणाला वाटावं, किती तरी जुनी मैत्री असावी त्यांची. इमॅन्युएलने अमानुल्लाला 'कॉलर ऑफ द अॅन्युन्झीएट' ही सर्वश्रेष्ठ पदवी दिली. आतापर्यंत इंग्लंडचा राजा, स्पेनचा राजा अशा फक्त बारा लोकांनाच तो मान मिळाला होता. त्यामुळं अमानुल्लाची शान आणखीनच वाढली. इंग्लंडच्या राजाच्या पंक्तीलाच जाऊन बसला तो !

आत्ता या वेळी सहज म्हणून जमून गेलेली त्यांची मैत्री, पुढे अमानुल्लाला किती उपकारक ठरायची होती !

अमानुल्ला-सरय्या फ्रान्सला आले. त्याअगोदरच फ्रेंचांनी 'सरय्या' या शब्दाचा अर्थ पाहून ठेवला होता. 'स्मितहास्य' याला 'सोरेरी' हा जो फ्रेंच शब्द आहे, त्याचे आणि 'सरय्या' या शब्दाचे विलक्षण साम्य त्यांच्या लक्षात आले. हे शब्दांमधले साम्य आणि त्याला पुरेपूर साजेसे असे सरय्याचे वागणे, यामुळे सरय्या पॅरिसमध्ये अत्यंत लोकप्रिय झाली. परदेशांत, परपुरुषांमध्ये बुरखा न घेता सरय्या प्रथमच वावरत होती; पण मुंबई, कैरो, रोम या प्रवासामुळे तिचा बुजरेपणा कमी झाला होता; तरी संकोच होताच. शिवाय खास पौर्वात्य ढंगाची आदब होती. आपल्या युरोपच्या दौऱ्यासाठी सरय्याने पॅरिसहून खास माणूस बोलावून कपडे शिवून घेतले होते. त्या माणसाने शिवलेल्या कपडयांमुळे सरय्याच्या खानदानी राणीपणाला आणि 'मुलाबाळांची आई' या व्यक्तित्वाला चांगलाच उठाव आणला होता. मुद्दामहून घटवून आणलेला सभ्यपणा, नकली आदब, नाटकी सौजन्य आणि या नटण्यामुरडयातच रमलेल्या त्या फ्रेंच बायकांमध्ये सरय्याचं वागणं एकदम उठून दिसत होतं; ताजेपणा आणणारं होतं. फ्रेंचांनी सरय्यावर स्तुतिसुमनांची उधळण केली. सरय्या फक्त सुंदरच नव्हती, तिची वागणूकच फक्त खानदानी नव्हती, तर ही एका छोटयाशा देशाची राणी, आपल्या देशातल्या मागासलेल्या बायकांना अंधारातून उजेडाकडे घेऊन जाण्याचा, अज्ञानातून ज्ञानाकडे घेऊन जाण्याचा अत्यंत धोकेबाज खेळ धारिष्टयाने खेळत होती. स्वातंत्र्य, समता बंधुभावाचे प्रेम असलेला फ्रेंचांना सरय्याचे फारच कौतुक वाटले.

बॉं-द-बोर्लॉ हे रमणीय रेल्वेस्टेशन लोकांनी फुलून गेलं होतं. अमानुल्लाची निळी आगगाडी स्टेशनात आली ती अशी की त्याचा खास डबा, स्टेशनावर अंथरलेल्या लाल गालिच्याला लागूनच उभा राहिला. सरय्या आता थोडं थोडं फ्रेंच बोलायला शिकली होती. पाश्चात्य पद्धतीप्रमाणे प्रथम सरय्याच डब्यातून उतरली. प्लॅटफॉर्मवर पाय ठेवताच, फ्रेंच पद्धतीप्रमाणे तिने आपला हात हलकेच पुढे केला आणि ती म्हणाली, 'बोन्जोर...' फ्रान्सचा प्रेसिडेंट शाही स्वागतासाठी आला होता. त्यानं किंचितसं झुकून अत्यंत सौजन्याने सरय्याचा हात हलकेच हातात घेतला.

फोटोग्राफर्सनी तो क्षण बरोबर टिपला होता !

तो फोटो छापलेली वृत्तपत्रं जेव्हा अफगाणिस्तानात पोचली तेव्हा सगळे अफगाणिस्तान हादरले. ही वृत्तपत्रं खेडेगावांतूनसुद्धा पोचतील याची चोख व्यवस्था ब्रिटिशांनी केली होती. त्यांची राणी बुरखा तर घालत नव्हतीच; पण एका काफीर माणसाशी हस्तांदोलन करीत होती ! काय भयंकर प्रकार चालला होता त्या युरोपमध्ये !

कंदाहार, हेरत, मजारेशरीफ, जलालाबाद सगळीकडं त्याचे पडसाद उठले आणि बऱ्याच लोकांचं म्हणणं पडलं की फोटोमध्ये दिसणारी सरय्या ही खरी सरय्या नव्हेच. हा ब्रिटिशांचाच काही तरी चावटपणा आहे.

शाही स्वाऱ्यांचे लंडनमधले दिवसही चांगले गेले. ब्रिटिश राजानं त्यांचं सार्वभौम राजाला साजेसं स्वागत केलं. अमानुल्ला इंग्लंडच्या राजाशी बरोबरीच्या नात्यानं वागत होता. शाही लोकांच्या मनोरंजनासाठी त्यांना काही नाटकं दाखवली गेली. पाहुणेमंडळी मुस्लिम राष्ट्रातील म्हणून नाटकंही मध्यपूर्वेतील शेख, शहा वगैरेबद्दलच होती आणि आपल्या मुस्लिम पाहुण्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ नयेत म्हणून त्या नाटकातला, अपुरे कपडे घातलेल्या बायकांनी आपल्या नाकावरून, या कानापासून त्या कानापर्यंत असा आडवा झिरझिरीत पडदा घेतला होता ! कारण सबंध शरीर झाकणारा बुरखा घालून नाटक काय करायचं हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर होता. सरय्याला इंग्रजी तर कळत नव्हतं, त्यामुळं ती नाटकं तिला चांगलीच कंटाळवाणी वाटली; पण बुरख्याची ती काही तरी वेगळीच पद्धत तिला एवढी आवडली की वेळ येईल तेव्हा आपणही तसाच बुरखा घालायचा हे तिनं तिथेच ठरवूनसुद्धा टाकलं.

रोम-पॅरिसप्रमाणे सरय्याने लंडनमध्येही भरपूर खरेदी केली. अमानुल्लानं नवीनच बांधलेला 'दिलखुश' राजवाडा आता तयार होत आला होता. त्यासाठी तिनं मशिननं विणलेल्या गालिच्यापासून, व्हिक्टोरियन पद्धतीच्या फर्निचरपासून, स्वैपाकघरात वापरण्यासाठी लागणारी इलेक्ट्रिसिटीवर चालणारी भांडी, विविध आकाराची, सुंदर काचपात्रे, फ्लॉवरपॉटस्पर्यंत सगळया वस्तू विकत घेतल्या. त्या वस्तूंनी दहा ट्रक्स भरले ! शिवाय अमानुल्लाने विकत घेतलेले युद्धाचे सामान, नवीन मशिनरी, विमानं वगैरे तर वेगळीच.

## रशिया आणि इराण

तिसऱ्या अँग्लो-अफगाण युद्धानंतर अमानुल्लाने ब्रिटिश वर्चस्व झुगारून, कम्युनिस्ट रशियाशी सलोख्याचे संबंध वाढवले होते; पण आता या शाही पाहुण्यांचं स्वागत कम्युनिस्टपद्धतीनं बरोबरीच्या नात्यानं करायचं की भांडवलशाहीपद्धतीनं, राजेशाहीपद्धतीचं करायचं हा रशियन सरकारपुढे पेच पडला होता; पण अमीर अमानुल्लाच्या मैत्रीत बाध यायला नको म्हणून रशियाने लाल रंगाचा गालीचा अंथरून परंपरागत पद्धतीनं स्वागत केलं. सरय्याची देखभाल करायला, मॅडम अलेक्झांड्रा कोलियेंटाल या सोव्हिएट अॅम्बॅसेडरेसो




(नॉर्वेला पाठवलेली यजमानीण म्हणून मुद्दामहून मास्कोला बोलावून घेतले होते. तिच्या हस्ते सरय्याला लाल गुलाबांचा गुच्छ देऊन इतर युरोपियन राष्ट्रांप्रमाणेच तिचे शाही स्वागत केलं.

अमीर अमानुल्ला हा मार्क्सवादी नव्हता तरी रशियाच्या साम्यवादाचं त्याला कौतुक होतं, बौद्धिक आकर्षण होतं. म्हणून रशियाला जाताना तो अतिशय उत्सुकतेनं गेला होता. सरय्याला रशियन-बायकांबद्दल अतिशय उत्सुकता वाटत होती. रशियन बायका खरोखरच मुक्त असतील; पण कशा? किती प्रमाणात?

पण दोघांचाही अपेक्षाभंग झाला. साम्यवादाच्या सायीखालचं जळणारं रशियन जीवन लक्षात यायला अमानुल्लाला वेळ लागला नाही.

एका समारंभाला जाताना तयार होत असताना सरय्या अमानुल्लाला म्हणाली, ‘युरोपमध्ये बायका एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगताहेत; पण इथं रशियामध्ये, सरकारी यंत्रणेचा एक भाग म्हणून त्या जगतात.’

‘बायकाच काय; पण पुरुषसुद्धा सरकारी यंत्रणेचा भाग आहेत आणि मग अफगाणिस्तानातल्या स्त्रिया?’

‘अफगाणिस्तानातल्या स्त्रिया?’ सरय्या एकदम नवल वाटून म्हणाली, ‘स्त्रियांना आत्माच नाही अशी जिथं समजूत आहे तिथल्या बायकांचं काय आयुष्य असायचं?’ युरोपच्या स्त्रिया आणि आपल्या अफगाण स्त्रिया यांची तुलना मनात येताच तिचं मन विषण्ण झालं. दोन टोकांवरची दोन वेगवेगळी विश्वं होती त्यांची, आणि सरय्या एका विश्वात वावरत असताना, दुसऱ्या विश्वाची स्वप्नं पहात होती.

‘बरोबर आहे. अगदी बरोबर आहे.’ अमानुल्ला एकदम उत्तरला, ‘आपला अफगाण बायकांनाच काय; पण अफगाण पुरुषांनाही आपापला आत्मा शोधायला लावला पाहिजे. टोळीतला एक म्हणून न जगता, स्वतंत्र बुद्धी असलेली व्यक्ती म्हणून जगा, हे त्यांना शिकवलं पाहिजे.’

रशियानंतर अमानुल्ला-सरय्या इराणमध्ये आले आणि पाच महिन्यांच्या उत्फुल्ल जीवनानंतर सरय्या आणि तिच्या बरोबरीच्या बायकांनी पुन्हा एकदा हॅटला लावलेले झिरझिरीत पडदे आपल्या चेहऱ्यांवरून सोडले! रोम, पॅरिस, लंडन बर्लीन, मॉस्को इथलं वातावरण केवढं वेगळं होतं! केवढं मुक्त, प्रफुल्ल वातावरण होतं ते. आता पुन्हा परतीची वाट सुरू झाली होती. अडचणींची, घुसमटलेली, जुनाट वाट... धर्मपिसाटांच्या वाटमारीची भीती असलेली, जुने रीतिरिवाज, कालबाह्य कायदे, परंपरा यांचे खाचखळगे असलेली ती दुर्घट वाट... अमानुल्लाच्या बरोबरीनं उघड्या गाडीतून, उजळ माथ्यानं हिंडणारी सरय्या आता पुन्हा बुरखा घालून वावरू लागली. फक्त बायकांच्याच अशा वेगळ्या मेजवान्यांना जाऊ लागली.

इराणच्या उलेमानं अगोदरच अमानुल्लाला पत्र पाठवून कळवलं होतं की, इराणमध्ये सरय्यानं संपूर्ण बुरखा घातला पाहिजे; पण सरय्यानं, अमानुल्लानं त्या पत्राकडं संपूर्ण दुर्लक्ष केलं. एवढंच नव्हे तर ‘मशाद’ इथल्या सोन्याचे कळस असलेल्या जगप्रसिद्ध मशिदीमध्ये नमाज पढायला सरय्या गेली ती सुद्धा अजिबात बुरखा न घेताच! या घटनेनंतर नऊ वर्षांनी इराणच्या शहाच्या बायकोला

मात्र बुरखा न घेता गेली म्हणून या मशिदीत पाऊल ठेवू दिले नव्हतं, तिथल्या उलेमानं. सरय्याला मशिदीत जाण्यासाठी कोणी नको म्हटले नाही, तरी पण ही गोष्ट कोणाला आवडलीही नाही.

सहा महिन्यांनंतर आपला विजयी दौरा संपवून, युरोपमधल्या बलाढ्य राष्ट्रांची मैत्री गाठीला बांधून, तिथल्या लोकांची मने जिंकून अमानुल्ला–सरय्या अफगाणिस्तानात परत आले तेव्हा सहाजिकपणेच संपूर्ण अफगाणिस्तानचे लक्ष लागले होते सरय्याकडे. जगभर काफीर लोकांत उजळ माथ्यानं वावरलेली आपली ही राणी इथं आपल्या देशात कशी वावरणार आहे? कंदाहारला अमानुल्ला–सरय्याच्या स्वागतासाठी प्रचंड गर्दी झाली होती. उघड्या मोटारीतून अमानुल्ला-बरोबर सरय्या जेव्हा जात होती तेव्हा सगळ्यांचे लक्ष होते सरय्याच्या चेहऱ्याकडेच. तिनं बुरखा घेतला होता; पण लंडनला पाहिलेल्या नाटकातल्या बायकांसारखा! तेवढाच का होईना, पण सरय्यानं बुरखा घेतला होता. अफगाणिस्तानच्या लोकांना बरं वाटलं.

## झपाटलेले दोघे

युरोपच्या दौऱ्यानंतर अमानुल्ला आणि सरय्या यांची दृष्टीच फाकली. स्वतंत्रतेच्या कक्षा किती रुंद असतात हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिलं. सामाजिक सुधारणा, आधुनिक कायदे, आधुनिक यंत्रे, आधुनिक तत्त्वविचार, आधुनिक जीवन, एवढंच काय, व्यक्तीच्या जीवनाच्या, राष्ट्राच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श करणारी आधुनिकता, हे सगळं पाहून, दुप्पट उत्साहानं, अट्टाहासानं दोघं कामाला लागले: त्यांच्यामध्ये झपाटलेपणा आला, घाई आली.

सरय्यानं आपल्या एका लेखात म्हटलं, 'इस्लामधर्माच्या स्थापने-पूर्वी बायकांना नवरा–बाप–मुलगा यांच्या आज्ञेतच जन्मभर रहावं लागायचं. इस्लामनं त्यांना पुरुषांबरोबरीचे अधिकार दिले. बायकांनी बुरखा घातला नाही तर त्यांना अमुक एक शिक्षा आहे असं कुराणात कुठंही सांगितलेलं नाही. काही लोकांमध्ये बायकांनी बुरखा घाला-यची पद्धत इस्लामच्या अगोदरच होती, तीच मग पुढे धार्मिक प्रथा झाली. काबाच्या यात्रेला जाताना किंवा नमाज पढताना, स्त्रियां-प्रमाणे पुरुषांनीही फक्त डोळे उघडे ठेवून सगळं अंग झाकावं अशी कुराणाची आज्ञा असताना, फक्त बायकांना मात्र सततच बुरख्यात ठेवले जाते, ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. अशा रूढींमुळे पौर्वात्य लोकांचं आयुष्य कधीच सुधारणार नाही. मानवी संस्कृतीच्या वाट-चालीत स्त्रियांचा अर्धा वाटा असताना, त्यांना पड्यात ठेवलं, शिक्षण दिलं नाही, तर संपूर्ण मानवजातीचं नुकसान होईल. पड्यात राहून शिक्षण घेता येतं असं म्हणणारे लोक हे संकुचित स्वार्थी आहेत. नुसतं लिहायला–वाचायला येऊन उपयोगाचं नाही. त्यांना पुरुषांच्या बरोबरीनं जीवन जगता आलं पाहिजे. पौर्वात्य लोकांनी बायकांना पडदा पाळायची सक्ती करू नये, नाही तर पाश्चात्यांचं एवढं अनुकरण केलं जाईल की, अगदी दुसरं टोक गाठलं जाईल.'

सरय्याचं हे १९२८ मधलं भाकित किती तंतोतंत खरं ठरलं आहे! आज बरोबर ५० वर्षांनंतर काबूल, कंदाहारसारख्या शहरां-तील बहुसंख्य मुली अत्याधुनिक फॅशनचे पाश्चात्य कपडे घालतात, अत्याधुनिक पद्धतीची रंगरंगोटी करतात; पण त्याबरोबर आजचे शिक्षण, आजचे विचार काही त्यांनी कपड्यांच्या वेगानं आत्मसात केलेले नाहीत. अजूनही परंपरेचं लोखंडी जोखड एवढं पक्कं त्यांच्या मानगुटीवर बसलेलं आहे की, रोझाचे उपास आम्हाला सोसत नाहीत म्हणून आम्ही ते उपास करीत नाही, असं बायकाच काय पण पुरुषही छातीठोकपणानं सांगू शकत नाहीत.

अमानुल्लानं बुरख्याविरुद्ध अजून तरी कायदा केला नव्हता. तरी पण बुरख्याविरुद्ध अविरत प्रचार सुरू होता. सरय्यानं आपल्या दिलखुष राजवाड्यात बायकांची एक मोठी सभा घेतली. त्या वेळी ती म्हणाली, 'युरोपमध्ये बायका पुरुषांच्या बरोबरीनं कामं करतात. शारीरिक कष्टांची कामं करतात, ऑफिसांतून कामं करतात. दीर्घो-द्योग हा युरोपिअन बायकांचा केवढा तरी मोठा गुण आहे. अफगाण बायका तर युरोपिअन बायकांच्या मानानं किती तरी तगड्या आहेत, तरीही त्या पुरुषांच्या बरोबरीनं कामं करीत नाहीत. नुसत्या बुरखे घालून बसलेल्या असतात म्हणूनच आपला देश अजून असा मागास-लेला. गरीब आहे. देश सुधारायचा असेल, आपलं रहाणीमान सुधारायचं असेल तर बायकांनी पडदा सोडून देऊन, शिकलं पाहिजे, कामं केली पाहिजेत. राष्ट्राच्या उभारणीत पुरुषांच्या बरोबरीनं भाग घेतला पाहिजे. मारहाण करणारा नवरा, उपाशी ठेवणारी, छळणारी सासू यांच्याविरुद्ध बायकांनी आवाज उठवला पाहिजे अशा नवऱ्यांना, अशा सासवांना झोडपलं तरी हरकत नाही. याबाबतीत कुणाला मदत हवी असेल तर माझ्याकडे या. मी चौकशीसाठी सरकारी माणसं पाठवीन; पण आता हा अन्याय कोणीही सहन करता उपयोगाचं नाही.'

१९२८ साली अमानुल्लानं 'लोया जिरगा' (पार्लमेंट) भरवून आपल्या अधिकाऱ्यांनी फक्त एकच लग्न केलं पाहिजे आणि लग्ना-साठी मुलीच्या बापाला फक्त २९ अफगाणी रुपयेच दिले पाहिजेत असा फतवा काढला. हा हुकूम मात्र कोणालाच पसंत पडला नाही. कारण चार लग्नं करणं हे प्रतिष्ठेचं लक्षण होतं आणि मुलींसाठी हजारो रुपये मुलींच्या लग्नात बापाला मिळत होते ते बंद झाले.

अमानुल्ला आणि सरय्या यांनी अफगाणिस्तानातून एकशेपाच तरुण मुलं आणि पंधरा मुली तुर्कस्तानला तांत्रिक शिक्षणासाठी पाठवल्या. काबूलमध्ये सरय्यानं त्या विद्यार्थ्यांना समारंभानं निरोप दिला. त्या मुलींनी सरय्या स्वतः वापरायची तसा, नाकावरून आडवा बांधला जाणारा बुरखा घातला होता. सरय्या युरोपला जाऊन आल्यावर तशा बुरख्याची फॅशनच झाली होती. त्या विद्यार्थ्यांच्या गाड्या अफगाणिस्तानातून बाहेर पडून पेशावरला येताच त्या मुलींनी तो बुरखाही काढून टाकला. बुरख्याखाली त्या मुलींनी आपले केस लांडे कापले होते, ओठ रंगवले होते, डोळ्यांना रंग लावला होता!

१९२८ च्या ऑक्टोबर महिन्यात 'लोया जिरगा'ची (पार्ल-मेंटची) सभा सुरू असताना, सरय्यानं एकदम उठून मोठ्या नाट्य-मय रीतीनं आपल्या चेहऱ्यावरचा तो झिरझिरीत पडदाही काढून टाकला. लोकांनी टाळ्या वाजवल्या. सभेमधल्या काही इतर बायकां-नीही आपापल्या चेहऱ्यांवरचे बुरखे काढून टाकले. जरी त्या सगळ्या बायका सरकारी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या बायका होत्या, तरी अफगाणिस्तानात प्रथमच बुरखा न घेतलेल्या अफगाण स्त्रिया समाजामध्ये दिसत होत्या!

बायकांना ज्या काही आपल्या तक्रारी–अगदी आपल्या नवऱ्याविरुद्ध, बापाविरुद्ध, मुलाविरुद्ध, सासूविरुद्धसुद्धा–मांडायला, त्यांचा न्यायनिवाडा करण्यासाठी सरय्यानं एका कोर्टाची स्थापना केली. काबूलमधल्या घराघरांतून म्हाताऱ्या बायकांना शिरून, कुठं बायकांवर कसले अत्याचार होत आहेत का ते पहाण्याचे, चौकशी करण्याचे अधिकार मिळाले. अफगाण स्त्रियांमध्ये नव्या जाणिवा येऊ लागल्या, जगण्याची ईर्षा, धारिष्टय येऊ लागले. एक नवं जग त्यांच्यापुढं आकार घेऊ लागलं. सर्वसामान्य थरातल्या बायकाही बुरखे फेकून देऊ लागल्या. कारण आता त्यांना सरकारी संरक्षण मिळाले होते. अशाच एका सर्वसामान्य बाईनं बुरखा फेकून दिला आणि आपली खाष्ट सासू, दारुडा, मारहाण करणारा नवरा यांच्याविरुद्ध तक्रार करण्याचा तिचा विचार सुरू होता, तशी धमकी तिनं सासूला आणि नवऱ्याला दिली होती. तेव्हा एक दिवस तिच्या नवऱ्यानं तिला मारून, तिचे तुकडे तुकडे करून टाकले ! तिच्या नवऱ्याला, सासूला शिक्षा तर झालीच, पण बुरख्यासाठी चाललेला हा भयंकर संघर्ष पाहून सरय्याच काय, पण सगळ्याच अफगाण बायका सुन्न होऊन गेल्या.

लोकांनी पाश्चात्य कपडे घालावेत असा अमानुल्लाचा अट्टाहास वाढतच होता. दारुलअमान (दर-अल-अमन) या शहरातल्या नवीन भागात, 'लोया जिरगा'मध्ये तर अफगाण कपडे घालून जायला बंदीच घातली होती. अमानुल्ला हातात कात्री घेऊनच हिंडायचा. अफगाण कपडे घातलेला माणूस दिसला की, तो सरळ त्या माणसाचे कपडेच कात्रीनं कापून काढायचा !

## प्रतिक्रिया–ब्रिटिशांची फूस

हळूहळू अमानुल्ला–सरय्याविरुद्धचे जनमत वाढू लागले. सामाजिक सुधारणांच्या विरुद्ध असलेल्या मुल्ला-मौलवींनी टोळीवाल्यांना भडकवायला सुरुवात केली. इस्लाम संकटात आहे. तुमच्या मुलींना बुरखा न घालता शाळेत जाऊन फिरंग्यांचं ज्ञान शिकावं लागेल; कुराणने तुम्हाला दिलेले अधिकार अमानुल्ला काढून घेत आहे; सरय्या ही वाईट बाई आहे, तुमच्या बायकांनाही ती तशीच वाईट करणार आहे; तुमच्या मुलांना जबरदस्तीने तुमच्यापासून ओढून स्वतःच्या सैन्यात भरती करते आहे वगैरे गोष्टी सांगून टोळीवाल्यांना चिथावणी मिळू लागली. त्याच वेळी अफगाणिस्थानातल्या शहरांतून, खेडेगावातून, डोंगरदऱ्यांमधून, जिथंजिथं माणसं रहात होती तिथंतिथं विमानातून सरय्याचे युरोपमधले फोटो टाकले गेले. एक फोटो तर उघड्यावाघड्या सरय्याचा होता; पण हा फोटो खरा नाही याची शहरवासियांची खात्री होती. कारण फोटोतली बाई नाचताना दिसत होती. ते पाहून लोक म्हणाले, 'कोणाला तरी नाचणाऱ्या बाईच्या शरीरावर सरय्याचे डोके चिकटवलेले दिसते आहे आणि फोटोग्राफीमध्ये एवढी सुधारणा फक्त ब्रिटिशांमध्येच झाली आहे. तेव्हा हे फोटो ब्रिटिशांनीच मुद्दामहून टाकलेले आहेत. आमच्या लोकांचे सरय्याबद्दल वाईट मत व्हावे म्हणून हा उद्योग ब्रिटिशांनीच केलेला आहे !' पण टोळीवाल्यांचा त्या फोटोवर विश्वास बसला.

अमानुल्लाविरुद्ध उठलेल्या लोकांची पहिली मागणी होती की अमानुल्लाने सरय्याला घटस्फोट दिला पाहिजे. त्याशिवाय परराष्ट्रमंत्री महंमद तरझीला तुरुंगात टाकावे, त्याच्याकुटुंबियांना हद्दपार करावे, पडदापद्धती पुन्हा सुरू करावी, पाश्चात्य कपडे घालायची सक्ती होऊ नये, मुलींच्या शाळा बंद कराव्यात, तुर्कस्तानला पाठवलेल्या मुलींना परत बोलवावे, नवीन कायदे काढून पुन्हा जुनेच इस्लामी कायदे चालू करावेत, मुल्लांना सरकारी अधिकाऱ्यांच्या जागा द्याव्यात, कर कमी करावेत, वगैरे त्यांच्या बऱ्याच मागण्या होत्या.

आपल्याच लोकांना सरय्याबद्दल वाटणारा द्वेष पाहून अमानुल्लाला धक्काच बसला. सरय्याला तलाक द्यायचा ? जिच्या बरोबरीनं एवढी वर्षं काम केलं, प्रत्येक गोष्टीत जिची अनमोल मदत झाली, जिच्या मदतीनं हा एवढा प्रचंड खटाटोप केला, तिला तलाक द्यायचा ? ज्या गोष्टी केल्या त्या सगळ्या याच लोकांच्या भल्यासाठी केल्या ना ? त्यांच्याच फायद्यासाठी केल्या ना ? आपल्या देशाला बलवान करण्यासाठी, जगातल्या कुठल्याही देशाच्या बरोबरीनं आणण्यासाठीच केला ना एवढा सारा खटाटोप ? आणि त्याचं हे फळ ? जिच्यामुळं या गोष्टी करणं शक्य झालं, तिलाच घटस्फोट द्यायचा ?

अमानुल्ला चक्रावूनच गेला. त्या लोकांवर एवढं जिवापाड प्रेम केलं, ज्यांच्या कल्याणासाठी झगडलो त्यांनी मला हाच न्याय द्यावा काय ?

सरय्या की आपले लोक ? असा सरळसरळ प्रश्न आता अमानुल्लासमोर उभा राहिला.

याच सुमारास बच्चा–ई–साकाव (या शब्दाचा शब्दशः अर्थ पाणक्याचा मुलगा) हा अतिशयच अशिक्षित, वाटमार, दरवडेखोर माणूस बराच त्रास देऊ लागला होता. अमानुल्लानं त्याच्या बंदोबस्ताचा प्रयत्न सुरू करताच, अगोदरच अमानुल्लाच्या विरुद्ध उठलेले लोक बच्चा–ई–साकावला मिळाले. डोंगरकपारीतून रहाणाऱ्या टोळीवाल्यांनी, मुल्लामौलवींनी बच्चाला आपला पाठिंबा दिला आणि अमानुल्लाविरुद्ध जिहादची हाक दिली. बच्चाची शक्ती वाढू लागली. त्याने काबूलवर पहिला हल्ला चढवल्यावर अमानुल्लाने सरय्याला, नूर–उस–सिराज, कुब्राजान (या दोघी त्याच्या बहिणी होत्या), उल्या हजरत, सरय्याची बहीण ख्वाकाब यांना मुलाबाळांसकट कंदाहारला पाठवून दिले. सरय्याने मेहनतीने चालू ठेवलेल्या मुलींच्या शाळा नुसत्याच बंद केल्या नाहीत तर शाळेचं मुद्दाहून बनवून घेतलेलं फर्निचर लिलावात विकून टाकलं ! तुर्कस्तानला पाठवलेल्या मुलींना परत बोलावलं, पाश्चात्य कपडे घालण्याची सक्ती काढून घेतली. स्त्रियांनी, सरय्या आणि आपल्या मुलींनी सुद्धा, बुरखा वापरला पाहिजे असा जाहीरनामा काढला, मुल्लामौलवींचे जुने हक्क-अधिकार त्यांना परत दिले, स्वतः चालू केलेला निजामनामा रद्द करून पुन्हा एकदा जुने इस्लामी कायदेकानू चालू केले.

नव्या जाणिवांचं स्वतःच्या हातांनी लावलेलं, सरय्यानं खतपाणी घातलेलं ते रोपटं अमानुल्लानं स्वतःच्याच हातांनी उपटून टाकलं ! सरय्या कंदाहारला गेली होती. तिथे ती आता नखशिखांत बुरखा घालून मुद्दाहूनच, लोकांनी पहावं म्हणून हिंडू–फिरू लागली, दिवसातून पाचही वेळा मुद्दामहून लोकांच्या लक्षात यावं अशा रीतीनं नमाज पढू लागली. पाच वेळा नमाज पढला म्हणजेच कोणी सच्चा मुसलमान होतो असं नव्हे, त्यापेक्षा लोकांनी काम जास्त करावे असे म्हणणारा अमानुल्ला आता पाचही वेळी नमाज पढू लागला !

आपल्याला कोणी 'काफर' म्हणू नये एवढीच त्यांची इच्छा होती!

आधार द्यायला सरय्या जवळ नव्हती, काबूलमधलं वातावरण तापत चाललं होतं, बिघडत चाललं होतं. स्वत: सुरू केलेल्या सगळ्या सुधारणा, चालू केलेले नवे कायदे त्यानं परत घेतले तरी भडकलेल्या डोक्याच्या लोकांचं समाधान होईना. तो एकटाच सगळा मानसिक ताण सहन करीत होता, तडफडत होता!

अशाच एका त्रस्त वेळी, अमानुल्लानं अलिया या आपल्या चुलत बहिणीला राजवाड्यावर बोलावून घेतलं. दोघंही लहानपणापासून एकत्र खेळले होते, एकत्र वाढले होते. अलिया आल्यावर अमानुल्लानं कोणत्याही प्रकारचं आडवळण न घेता तिला विचारलं, 'अलीया, तू माझ्याशी लग्न करशील?'

'का?' आलियानं शांतपणानं विचारलं.

'का?' अमानुल्ला हरवलेपणानं म्हणाला, 'कारण तू मला आवडतेस. माझं प्रेम आहे तुझ्यावर.'

'आणि सरय्या?'

अमानुल्लानं तरझीला दिलेलं वचन अलियाला माहीत होतं.

'सरय्या?' अतिशय विमनस्कपणानं अमानुल्ला म्हणाला, 'सरय्या तिकडे कंदाहारला आहे. ती आता बुरख्यातच वावरते आहे. काय गंमतच आहे नाही?... पण मला तुझ्याशी लग्न करायचं आहे, माझं प्रेम आहे तुझ्यावर.'

अलिया एवढी खुळी नव्हती. अमानुल्ला आपल्याशी लग्न करायला का तयार झाला होता त्याचं कारण तिला ओळखू येत होतं. जर आपण दुसरं लग्न केलं तर धर्मपिसाट लोकांचा आपल्यावरचा राग कमी होईल अशी त्याला आशा वाटत होती; पण अलियाचं मात्र खरोखरच अमानुल्लावर प्रेम होतं. तिनं जाणून बुजून सगळं काही माहीत असताना लग्नाला होकार दिला. ताबडतोब त्याच दिवशी एका मुल्लाला बोलावून आणलं आणि अमानुल्लाचा फक्त एक खाजगी सेक्रेटरी साक्षीदार असताना अलिया–अमानुल्लाचं लग्न झालं. तरीपण लोकांचा अमानुल्लावरचा राग कमी झाला नाही.

## काबूल सोडले

बच्या पुन्हा पुन्हा काबूलवर हल्ला चढवीत होता. शेवटी १९२९ सालच्या मे महिन्याच्या २२ तारखेला पहाटे २ वाजता अमानुल्लाने काबूल सोडले... परांगदा होण्यासाठी... त्याला वाटले, बच्या, टोळीवाले, मुल्लामौलवी सगळे व्यक्तिश: त्याच्याविरुद्ध उठले आहेत. आपणच निघून गेलो तर निदान हा झगडा लौकर मिटेल आणि बच्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा इंग्रजांचा अफगाणिस्तानाच्या राजकारणात शिरकाव होणार नाही. अमानुल्लाची खात्री होती की हा सगळा बनाव ब्रिटिशांच्या चिथावणीमुळेच झालेला आहे. त्यांच्या मदतीनेच बच्या, टोळीवाले लढत आहेत. तसं वाटण्याची कारणेही अगदी सबळ होती. अमानुल्लाला वाटत होतं, एकदा हे वादळ शमलं की माझं लोकच मला परत बोलावतील.

अमानुल्ला रात्रीच्या वेळी प्रवास करीत, लपतछपत कंदाहारला जाऊन पोचला. अफगाणिस्तानाबद्दलची केवढी तरी भव्यदिव्य स्वप्नं रंगवणारे, त्यासाठी झगडणारे अमानुल्ला–सरय्या ही दोघं, त्यांच्या स्वप्नांचे सगळे किल्ले तिकडे पाठीमागे, काबूलला ढासळत असताना,



**सरय्या आणि अमानुल्ला**
**अखेर लाडक्या अफगाण मातीत मिळून गेले...**

आपला कुटुंबकबिला घेऊन अफगाणिस्तानातून गुपचूपपणानं– बाहेर पडले. आता जायचं कुठं हा फार मोठा प्रश्न त्यांच्यासमोर होता.

ब्रिटिश सत्ता पूर्वीच झुगारून दिल्यामुळे ब्रिटिश सरकारनं अमानुल्लाला हिंदुस्तानात थारा देण्यास नकार दिला. आतापर्यंत अफगाणिस्तानातून परांगदा झालेल्या कित्येक शाही लोकांना ब्रिटिश सरकारने पेन्शन देऊन हिंदुस्तानात ठेवून घेतले होते; पण अमानुल्लाला ठेवून घ्यायला ब्रिटिश सरकार तयार नव्हते.

आपल्या कर्तृत्वाने सगळ्या मुस्लिम जगात लोकप्रिय झालेल्या, आपल्या वागण्याने, मिठास वाणीनं सबंध युरोपमध्ये आवडत्या झालेल्या, एके काळच्या या राजाराणीला कुठेच थारा मिळेना. ब्रिटिशांचा रोष व्हायला नको म्हणून मुस्लिम जगातलं एकही राष्ट्र अमानुल्ला-सरय्याला ठेवून घ्यायला तयार होईना. ब्रिटिशांशी दुश्मनी कोण स्वीकारणार? कुठे जावे हे त्यांना कळेना. त्यावेळी अमानुल्ला आपल्या नशिबाच्या नावाने खडे न फोडता म्हणाला, 'मी काही पूर्वीच्या इराणच्या शहासारखा वाया गेलेला राजा नाही. माझ्या लोकांच्या कल्याणासाठी मी रात्रंदिवस झगडलो. म्हणूनच आता माझ्या पडत्या काळात मला एकच समाधान आहे की मी गैर गोष्ट एकही केली नाही. सतत माझ्या लोकांचाच विचार मी करीत

होतो. रशियाच्या झारप्रमाणे मला माझ्या कुटुंबियांबरोबर मारून टाकलं नाही हेच माझं दुःख आहे आणि आता मला कुठकुठे भटकत रहावं लागणार आहे कुणास ठाऊक ?'

अशा वेळी अमानुल्लाचा मित्र, इटलीचा राजा व्हिट्टोरियो इम्यॅन्युएल यानं त्यांना आसरा दिला. रोममधला एक प्रासाद त्यांना राहायला दिला. इनायतुल्ला आपल्या बायकोमुलांना घेऊन इराणला गेला. उलाहजरत, मोहंमद तरझी इस्तंबूलला गेले. रोमला आल्याबरोबर अमानुल्लाने अलियाला घटस्फोट दिला आणि तिला दुसरे लग्न करण्याची विनंती केली; पण अलियाने दुसरे लग्न केले नाही.

अमानुल्ला आणि सरय्या आपल्या मुलांना घेऊन रोममध्ये राहू लागले. बरोबर आणलेल्या पैशामध्ये अत्यंत गरिबीत त्यांचे दिवस जाऊ लागले. वेळ जाण्यासाठी आणि पैसे मिळवण्यासाठी अमानुल्ला लाकडी टेबलखुर्च्या करून विकू लागला. फक्त राज्य करण्याचंच शिक्षण मिळालेल्या या राजपुत्राला दुसरं काहीही करता येत नव्हतं. हौशीनं शिकलेली ही विद्या त्याला अशी उपयोगाला आली होती. अफगाणिस्तानातलं राकट तरीही रमणीय निसर्गसौंदर्य, काबूलमधल्या बागा, तिथल्या बाजारातले, शहरातले विविध वास, सुगंध, तिथलं निळंभोर स्वच्छ आकाश, रबाबच्या साथीवर गायली जाणारी, हुरहूर लावणारी तिथली ती आर्त लोकगीतं आणि आपल्या लोकांचे घसमुसळे रागलोभ आठवले की, त्यांचा जीव कावराबावरा व्हायचा. आपल्या मुलांना आपल्या आयुष्यातल्या आठवणी सांगत, अफगाणिस्तानातले दिवस आठवत, त्यांचं एकलकोंडं आयुष्य जात होते. त्यांना अजूनही आशा वाटत होती, आज नाही उद्या वातावरण निवळेल, सगळे काही स्थिरस्थावर होईल, मग लोकांना आपली किंमत कळेल आणि लोक पुन्हा आपल्याला परत बोलावून घेतील !

अमानुल्लानंतर बच्याचा पराभव करून त्याच्याच चुलत घराण्यातील लोकांचे राज्य सुरू झाले होते. त्यांनी अमानुल्लाला भेटण्याची लोकांवर बंदी घातली होती. पुढे बरेच वर्षांनी ही बंदी काढण्यात आली. अमानुल्ला अत्यंत हलाखीत दिवस ढकलतोय ही बातमी कळल्यावर अफगाण सरकारने अमानुल्लाला थोडीशी पेन्शन द्यायलाही सुरुवात केली होती.

आता अधूनमधून कोणी तरी अफगाण मुद्दाम येऊन अमानुल्लाला भेटू लागला. अशाच एका वेळी त्यांचा एक दूरचा नातलग त्यांना भेटायला आला होता. नेहमीप्रमाणेच अमानुल्लाचा पहिला प्रश्न होता, 'माझे–अफगाण लोक कसे आहेत ?' तो माणूस पाय पुसण्याला पाय पुसून सरय्याच्या खोलीत जाऊ लागला तेव्हा सरय्या त्याला म्हणाली, 'अरे, अरे, तुझे पाय असे पुसू नकोस. तुझ्या पायाला लागलेली अफगाणिस्थानातली धूळ माझ्या घरात येऊ दे !'

आपल्या देशावर, आपल्या लोकांवर अपरंपार प्रेम केलेला हा परागंदा झालेला अमीर अमानुल्ला ३१ वर्षांच्या निर्वासितपणानंतर, लिव्हरच्या दुखण्याने–स्वित्झर्लंडमध्ये, अगदी अलिकडे, म्हणजे १९६० साली मरण पावला. तोपर्यंत अफगाणिस्थानातले वातावरण चांगलेच निवळले होते. इटॅलियन सरकारने शाही इतमामाने, खास विमानातून अमानुल्लाचे शव अफगाणिस्थानात पाठवले. जलालाबादमध्ये त्याच्या शवपेटीला खांदा देणाऱ्या त्याच्या चुलतभावांना, सावत्रभावांना बाजूला सारून, ज्या शिनवारी टोळीवाल्यांनी अमानुल्लाला परागंदा व्हायला लावले होते, त्यांनीच शेवटी त्याला खांदा दिला. आपल्या लाडक्या अफगाणिस्थानाच्या मातीतच मिळून जाण्याची अमानुल्लाची इच्छा अशी पुरी झाली.

सरय्या १९६८ साली रोममध्ये मरण पावली. पुन्हा एकदा इटालियन सरकारने शाही इतमामाने, खास सैनिकी विमानातून तिचे शव अफगाणिस्थानात पाठवले. तिची शवपेटी असलेले विमान जलालाबादला उतरले तेव्हा विमानतळावर, कबरस्थानात टोळीवाल्यांची खूप गर्दी झाली होती. अफगाण सरकारला काळजी वाटत होती की हे लोक काही दंगा वगैरे तर करणार नाहीत ? पण कुराणातील वाक्यं लिहिलेली–सरय्याची शवपेटी विमानातून बाहेर येताच त्या टोळीवाल्यांनी माना झुकवून सरय्याला सलामी दिली. एवढंच नव्हे तर एका मुल्लाने अगदी उत्स्फूर्तपणाने तिची, तिच्या कामाची तारीफ केली. कबरस्थानमध्ये–दफनविधीच्या वेळी सरय्याच्या कुटुंबातल्या काही बायकाही आल्या होत्या ! असं कधीच झालं नव्हतं. ते नवल घडलं होतं. अमानुल्ला शेजारीच सरय्याला ठेवून सगळे मोठमोठे लोक निघून गेले.

त्यानंतर नखशिखांत काळा बुरखा घातलेल्या काही अफगाण बायका, एकापाठोपाठ, रांगेनं मुकाटयानं तिथं आल्याबरोबर आणलेली पांढऱ्या गुलाबांची फुलं मूकपणानं सरय्याच्या ताज्या कबरीवर वाहून, डोळ्यांसमोरच्या जाळीतून टकाटका बघत राहिल्या. याच त्यांच्या राणीने त्यांच्यासमोर नव्या जगाचा दरवाजा उघडला होता. त्यांच्या नजरेसमोर नवीन क्षितिजं आणली होती; पण त्या कशाचाच काहीही उपयोग झाला नव्हता. त्या राणीलाच परागंदा व्हावं लागलं होतं. आणि तिच्या कबरीवर फुले वाहण्यासाठी त्या बायकांना बुरखे घालूनच, कोणालाही नकळत, असं मुकाटयानं यावं लागलं होतं ! □

**(लेखांक चवथा . . . पुढील अंकी)**

# पुस्तके

प्रा. शरद वाघ

# शैक्षणिक सहली

## एक उपयुक्त पुस्तक

वर्गात सहलीची सूचना घेऊन जेव्हा सेवक येतो व वर्गशिक्षक ती वाचून दाखवतात तेव्हा आनंदाने मुलेमुली वर्ग डोक्यावर घेतात. शिक्षकांना पुरी सूचना वाचूनसुद्धा दाखवता येत नाही. ही आनंदाची बेहोषी ज्यांनी अनुभवली आहे त्यांना शालेय जीवनात सहलीचे स्थान वेगळचा तऱ्हेनं सांगण्याची आवश्यकता नाही.

गेल्या पंधरा वर्षात आणखी एक चांगला बदल समाजात दिसून येत आहे. तो म्हणजे केवळ शाळेच्याच मुलांच्या नव्हे, तर समाजातील सर्व थरांत सर्व तऱ्हेच्या सहली निघू लागल्या आहेत. मंगल कार्यालयाचा, चांगल्या लॉजिंग–बोर्डिंगचा व्यवसाय जशी नवी प्रतिष्ठा घेऊन भरभराटीस आला त्याचप्रमाणे विविध तऱ्हेच्या, यात्रा-सहली यशस्वीपणे पार पाडणारी व्यावसायिक मंडळीही पुढे आली. सहलीच्या आकर्षक जाहिराती येऊ लागल्या. आपलाच देश नव्हे, तर आता भारताचे शेजारी श्रीलंका, नेपाळ त्याचप्रमाणे युरोप-अमेरिकेच्याही सहली निघू लागल्या आहेत. परवा पुणे महानगरपालिकेने शालेय हुषार मुलांसाठी सहल काढली. पुणे भूगोल विषय शिक्षक संघटनेने स्वतंत्र गाडी आरक्षित करून दक्षिण भारताची दिग्विजयी सहल तीन वर्षापूर्वी काढली होती. सहल आता जनमानसात रुजली आहे.

आपल्या पूर्वीच्या यात्रा, वारकऱ्यांची वारी, देवींचे उत्सव आणि जत्रा म्हणजे सहलीच असत; पण सालाबादप्रमाणे येणारे त्याचे कंटाळवाणे रूप बदलणारे कल्पक सुधारक हवेत. शालेय सहलींनासुद्धा चांगलं रूप देण्याची आवश्यकता तीव्रतेने भासू लागली होती. शिक्षक हौसेने अनेक हाल-अपेष्टा सहन करून सहली काढत होते. हौसेला मोल नाही या दृष्टीने या साऱ्याच शिक्षकांचे कौतुकच करायला हवे. दुर्दैवाने शिक्षकांत एक गट असाही आढळतो की, या पोरटयांबरोबर सहल म्हणजे निकाल लागला! वर्गात धड बसत नाहीत. गाडीत तर टपावरच बसतील ! नको रे बाबा ती सहल ! अशा रडचा शिक्षकांबद्दल न बोलणेच बरे ! सहलीची सांगोपांग माहिती देणाऱ्या पुस्तकाची सध्या नितांत आवश्यकता होती. श्री. सुरेश तांबे यांचेच १९६६ मधे प्रकाशित झालेले 'शालेय सहली' हे पुस्तक यासाठी सर्वत्र वापरले जाई ! पण आता 'शैक्षणिक सहली' हे त्यांचेच नवे व्हीनस प्रकाशनने काढलेले पुस्तक मागचा अनुभव, त्रुटी लक्षात घेऊन लिहिल्यामुळे अधिक दर्जेदार, उपयुक्त व देखणे झाले आहे. 'ऋणनिर्देश' या मनोगतात लिहिताना या पुस्तकाची तयारी मी कशी केली, किती जणांना भेटलो, किती जणांच्या मुलाखती घेतल्या, टिपणे कशी काढली याची जी हकीकत श्री. सुरेश तांबे यांनी दिली आहे, त्यावरून नुसती नजर फिरवली तरी लेखकाचे पुस्तकाचे यश कशात आहे ते कळते.

पुस्तकाच्या अंतरंगात एक योजना आहे. एक विचारांची सुसूत्र साखळी आहे, निश्चित अशी मांडणी आहे. ही प्रकरणांची क्रमशः नावे पहा. 'चला सहलीला', 'सहेतुक चला', 'पूर्व तयारी आवश्यक,' 'बरोबर काय घ्याल ?', 'कसे निघणार ?', 'आनंद गमावू नका,' 'असा आनंद वाढवा', 'सहलीतील शिक्षण', 'अशा जाहल्या सहली,' 'छावणी जीवन, 'साहस सहली,' अपेक्षा व अडचणी' आणि शेवटचे सुंदर प्रकरण म्हणजे 'निवडक भारतदर्शन.' या पुस्तकातले परवलीचे शब्द म्हणजे उद्दिष्टे आधी ठरवून सहेतुक हे आहेत.

सहल म्हटले की किती बाळंतपणे करावी लागतात ! नुसता एस. टी. खात्याशी पत्रव्यवहार ही एक बाबसुद्धा अति जिकिरीची असते; पण श्री. सुरेश तांबे यांनी इतकी अद्ययावत माहिती दिली आहे की, आता कोणालाही कसलीही अडचण येणार नाही. जसा एखादा नीट बांधेसूद मुद्द्यांना धरून निबंध लिहावा तसे हे पुस्तक गुंफले आहे. विचारांना बांधीव, रेखीव स्वरूप देणारे आम्हा पिढीचे गुरु शिक्षण प्रसारक मंडळीमधील शिक्षक, प्राध्यापक म्हणून काम केलेले डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांची जागा हळूहळू श्री. तांबे भरून काढत आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. या पुस्तकात नकाशे आहेत, मैलांचा तपशील आहे, सुंदर चित्रे आहेत आणि प्रत्यक्ष अनुभव दिले आहेत. रेल्वे आणि एस. टी. खात्याची सहलीच्या दृष्टीने उपयुक्त माहिती हे या पुस्तकाचे खास वैशिष्टच आहे.

नव्या पुढल्या आवृत्तीत लेखकाला काय काय भर घालता येईल हेही सांगितले पाहिजे.

एस. टी., रेल्वे, स्कूटर यांच्या जोडीला 'विमानाने सहल' हे एक नवे प्रकरण यावे.

सहलीत निसर्गाचा आनंद कसा मनमुराद लुटता येतो; मग वृक्ष,खडकांचे प्रकार सूर्योदय-सूर्यास्त, जंगलांचे सौंदर्य, वन्य पशुपक्षी यासंबंधी माहिती असावी. 'आनंद कसा वाढवावा' यात कोणकोणत्या आनंदाच्या आरोळ्या ( Yells ) द्याव्यात ते द्यावे. नवीन नवीन छान छान गीते भरपूर द्यावीत.

सिंहगडचा नकाशा फिरवून सिंहगड वर येईल असे पहावे. पान ११० ते ११७ यात आडवे छापलेले फॉर्मस् रेल्वेच्या टाइम-टेबल सारखे वाटतात. वाचताना कंटाळा येतो, ते आकर्षक तऱ्हेने मांडावेत. पान ६५ वर 'आनंद गमावू नका !' येथील तपशील जरा निराळ्या पद्धतीने मांडता आला असता. उदा. ( पान ६५ परिच्छेद ४ ) लेखक लिहितात–

'— कऱ्हाडचा प्रीतिसंगम पाहायला काही विद्यार्थी व शिक्षक गेले. सर्वजण पहात होते. माहिती घेत होते. तेवढ्यात एक चिरंजीव पाण्यात गेले आणि ते गेलेच ! आली की नाही पंचाईत ?—'

येथे थोडी अलिप्तता वाटते. परदुःखातील शीतलता जाणवते, 'पंचाईत' एक चिरंजीव' हा उल्लेख खटकतो. त्याऐवजी—

'पाण्याचे विशाल पात्र पाहून त्या मुलाला एकदम स्फूर्ती आली आणि काय होत आहे हे कळायच्या आत तो पाण्यात नाहीसा झाला आणि साऱ्या सहलीतला आनंद गेला! आजही आठवण झाली की, हृदयात चर्रर्र होते ! जेव्हा जेव्हा आमच्या शाळेची सहल जाते तेव्हा मुलांना मी हा अनुभव सांगतो आणि वहित एक वाक्य टिपून घ्यायला सांगतो—

Luck prevents some accidents, but care prevents all accidents—

चित्रा नाईक यांची प्रस्तावना व 'व्हीनस प्रकाशन' एवढी दोन नावे उच्चारली म्हणजे पुस्तकाचे अंतरंग व बाह्यरंग ही दोन्हीही चांगली असणार हे ओघाने आलेच.

श्री. सुरेश तांबे यांच्या पाठीवर मी आणखी एक शाबासकीची थाप मारणार आहे. ती अशासाठी की, त्यांनी इतर शिक्षकांना प्रेरणा देणारा हा सुंदर उपक्रम केला आहे. पुण्यात व इतरत्रही किती तरी गुणी शिक्षक मी पाहिले आहेत. प्रत्येकाचा अभ्यासाचा, आवडीचा एकेक खास छंद आहे. बालनाट्य आहे, नियतकालिके, सांस्कृतिक कार्यक्रम, संमेलने, विज्ञानमंडळे, कार्यानुभव, वीरबाला व बालवीर पथक, एक ना दोन ! हे सारे भांडार पुस्तकरूपाने नको का काढायला ? डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी प्राध्यापक झालेल्या आम्हा विद्यार्थ्यांना एक संदेश दिला होता, 'आयुष्यात ग्रंथ लिहा, पुस्तके लिहा !'

'शैक्षणिक सहली' हे उपयुक्त पुस्तक सहलीसारखेच प्रसन्न व चित्तवृत्ती उल्हसित करणारे आहे. त्याबद्दल श्री. सुरेश तांबे यांना मनःपूर्वक धन्यवाद ! ◻

**शैक्षणिक सहली**
ले. श्री. सुरेश तांबे
व्हीनस प्रकाशन, पुणे
पृष्ठसंख्या १५३, मूल्य ७ रु.

**ग्रंथ आणि ग्रंथकार**

## काही लोकप्रिय इंग्रजी लेखक–३

# रॉबर्ट लुडलम्

हा लेखक सध्याच्या ४–५ सुपर लोकप्रिय लेखकांपैकी एक आहे. कट करणे, राजकीय उलथापालथ वगैरे प्रकार त्याच्या पुस्तकात भरपूर असतात. या लेखकाने आतापर्यंत ७–८ पुस्तके लिहिली. माणूस जसा उतार वयात वजनाने वाढत जातो, तशी या लेखकाची अगदी अलीकडची पुस्तके जाडजूड होत आहेत. या जाडीमुळे मात्र या पुस्तकांच्या लोकप्रियतेला बाधा आली नाही. उलट ही लोकप्रियता वाढतच आहे.

लुडलम्च्या 'द चॅन्सेलर मॅन्युस्क्रिप्ट' या पुस्तकात त्यांनी असा दृष्टिकोन मांडला आहे, की जे. एडगर हुवर (FBI डायरेक्टर) हा नैसर्गिकरीत्या मरण पावला नसून त्याचा खून झाला होता. हुवरच्या फाइली त्याच्या मृत्यूनंतर मिळाल्याच नव्हत्या. या पुस्तकातही तसेच दिले आहे. शेवटी शेवटी हुवर हा लोकांना ब्लॅकमेल करायचा– तो इतका की कोणत्याही देशातील लोकशाहीला तो पेलला नसता आणि अमेरिकेत लोकशाही व स्वातंत्र्य या नावाखाली काय कमी खून झाले आहेत ? हुवर तर स्वतःचे असे एक राज्यच चालवत होता. एकदा तर FBI ने निक्सनच्या मैत्रिणीवर टेप्स ठेवले होते. (निक्सन त्या वेळेला अध्यक्ष होते.) या मैत्रिणीचे नाव होते मिसेस लू आणि हे टेप्स FBI ने कुठे ठेवले होते ? तर हाँगकाँगमध्ये. FBI ने मिसेस लू वर एक भली मोठी फाईलच केली होती आणि ही फाईल तीन वर्षे सक्रीय होती. CIA अमेरिकेबाहेर डर्टी ट्रिक्स करण्यात पटाईत असे तर FBI खुद्द अमेरिकेतच डर्टी ट्रिक्स करते असा एक समज आहे; पण अमेरिकेपासून हजारो मैल लांब हाँगकाँगमध्येसुद्धा FBI टेप्स ठेवू शकते याची बऱ्याच लोकांना कल्पना नव्हती. एकदा तर FBI ने मार्टिन ल्यूथर किंगचे चारित्र्यहननच करण्यास सुरुवात केली होती. किंगला १९६४ साली शांततेसाठी नोबेल पारितोषिक मिळाले होते. त्याआधी ३४ दिवस FBI ने किंगला एक टेप पाठवली. या टेपचा मजकूर डॉ. किंगच्या जीवनाशी असा निगडित होता, की FBI ला वाटले ती ऐकून डॉ. किंग आत्महत्या करतील. सौ. किंगनासुद्धा अशीच एक टेप पाठवली होती. हेतू हा होता की, डॉ. किंगच्या वैवाहिक जीवनाचा बोऱ्या वाजावा. FBI ने एका कॉलेजला डॉ. किंगला पदवी देण्यापासून परावृत्त केले होते. एकदा तर खुद्द डॉ. किंगबद्दल बरेवाईट रिपोर्ट पाठवून पोपनी त्यांना भेटू नये असा बेत आखला होता.

FBI ने खरे उद्दिष्ट म्हणजे अमेरिकेत कायदा व सुव्यवस्था राखणे; परंतु हुवरच्या कारकीर्दीत FBI ला इतके पाय फुटले होते, की शेवटी या पायांनीच हुवर तुडवला गेला. अर्थात् 'कम्युनिझम्चा शिरकाव' या सबबीखाली तेथील संस्थेने किंवा सरकारने इतके गुन्हे केले असतील की त्याची माफीयालासुद्धा लाज वाटावी.

रॉबर्ट लुडलमला Paranoid Novelist म्हणतात. Paranoia म्हणजे स्वतःचा छळ चालला आहे अशी (बिनबुडी) भावना.

लुडलमची पुस्तके नेहमी कोणत्या तरी कटा-भोवतीच घुटमळत असतात हे मी याआधी सांगितलेच आहे. कट म्हणजे छळ आलाच. लुडलमला वाटते, की या जगात काही लोक सत्तेसाठी इतके हपापलेले असतात की कुठे ना कुठे एखादा मोठा कट शिजत असतोच. अर्थात या कटापासून सामान्य लोकांना फार धोका असतो. (आपल्या भारतात सध्या हा धोका फार मोठा आहे). लुडलमच्या पुस्तकातील बहुतेक कट फॅसिस्ट प्रकारचे असतात. लुडलम हे पूर्वी नाटक-सिनेमाच्या धंद्यात होते. ते स्वतः नट व निर्माते होते. लेखकांना काय किंवा नटांना काय, वाचकांचे व प्रेक्षकांचे लक्ष ठराविक काळापर्यंत आपल्या-कडे ओढणे, नंतर त्यात बदल करणे व शेवटी ते सोडून देणे (Climax) अशी काही तरी किमया साधावी लागते. अशा किमयेत कटाचा फार उपयोग होतो असे लुडलम म्हणतात.

लुडलमना वाटते, की त्यांच्या सिनेमा-नाटकांतील अनुभवांमुळे त्यांना लेखक बना-यला फारच मदत झाली. प्रेक्षक केव्हा बोअर होतील व वाचक केव्हा कंटाळतील तिथेच सारं लक्ष केंद्रित व्हायला पाहिजे म्हणजे यशस्वी होता येईल, असे त्यांचे मत आहे.

सध्याच्या बऱ्याच लोकप्रिय लेखकांचे 'सेक्स' हे भांडवल असते. ॲलिस्टेअर मॅक्लिन त्याला पहिले अपवाद ठरले आणि आता लुडलम हे दुसरे. लुडलम कबूल कर-तात, की सध्या जगाचे वातावरणच असे आहे, की कट हा शब्द कुठे वाचला वा ऐकला की आपले डोळे किंवा कान सरसाव-तात. या गोष्टीचे त्यांनी त्यांच्या पुस्तकात भांडवल केले आहे. जॉन केनेडीच्या खुना-पासून जगात कट वाढायला लागले आहेत असे त्यांना वाटते. तसे कट अनाधिकाळा-पासूनचे आहेत; परंतु जसजशी नीतिमूल्ये ढासळत जातात तसतसे कटांना पेव फुटते.

प्रतिकात्मक, सांकेतिक लिखाण वाचकांची पकड घेऊ शकत नाही (अटेन्शन खटाव-वाडी!) असे लुडलम म्हणतात. त्यांच्या पुस्तकात आधीच कटामुळे वाचकांची उत्कंठा भलतीच जागृत झालेली असते. त्यात परत सफाईदार सुरुवात, मध्य व शेवट. यामुळे शेवटपर्यंत वाचक hooked झालेला असतो! १९५० ते १९७० या काळात अमेरिकेत नवोदित लेखक Pseudopsychological होते असे लुडलमना वाटते. 'Stream of Consciousness' कादंबऱ्यांसारख्या अनेक कादंबऱ्या या काळात लिहिल्या गेल्या; पण त्यातली एकही कादंबरी जेम्स जॉईस किंवा व्हर्जिनिया वुल्फच्या तोडीची नव्हती.

लुडलमही हेरॉल्ड रॉबिन्ससारखे चार्लस् डिकन्सचे उदाहरण देतात. त्या वेळच्या टीकाकारांनी डिकन्स, थॉमस हार्डी, मार्क ट्वेन या लोकप्रिय लेखकांना झोडपून नव्हते का काढले? सध्याच्या बहुतेक इंग्रजी लोकप्रिय लेखकांनी हे उदाहरण द्यावे याचे आश्चर्य वाटते. टीकाकारांनी झोडपणे याचा अर्थ त्या लोकप्रिय लेखकांना Posterity मधील पिढ्यांत अढळ स्थान मिळाले हा एक खोल मनातील defence mechanism चाच प्रकार असला पाहिजे. एक तर डिकन्स व थॉमस हार्डी या कादंबरीकारांच्या काळची परिस्थिती व मूल्ये वेगळी होती. दुसरे म्हणजे कादंबरीत एक प्रकारचा जिवंतपणा आणण्याची ताकद त्यांच्यात होती. त्यांच्या कादंबरीत हा जिवंतपणा असला तरी धकाधकी व पळापळीच्या जीवनात त्यांचा संथपणा सहन होत नाही. संथपणाचा आक्षेप त्यांच्यावर जरूर करता येईल; पण त्यांच्या कादंबरीतील पात्रे जशी Pulsate व Vibrate होतात तशी पात्रे अलीकडे हे लोकप्रिय लेखक रंगवतात का?

रॉबर्ट लुडलम मात्र टीकाकारांच्या कचाटयातून सुटले आहेत असे ते म्हणतात. सर्व टीकाकार मद्य प्यायले असतील असे लुडलम म्हणतात! लुडलमनी जरी टीका-कारांचा असा अपमान केलेला असला तरी टीकाकारांविषयी एक गोष्ट मान्य करावी लागेल. ती म्हणजे त्यांची बुद्धिमत्ता. टीका-कारांवर बऱ्याच वेळा असा आक्षेप असतो की, ते पुस्तके न वाचताच परीक्षण लिहीत असतात! आता जर एखादे पुस्तक न वाचताच ते इतके लिहू शकतात तर मग वाचून ते किती चांगले लिहू शकत असतील! एखादा तज्ज्ञ वैद्य पेशंटची नाडी बघून सर्व काही ओळखतो, त्याचप्रमाणे टीकाकारांना पुस्तक हातात घेऊन बरेच काही कळत असावे.

रॉबर्ट केनेडी हे एका कटात मारले गेले असतील असे लुडलमना वाटते. रॉबर्ट केनेडी यांनी व्हिएटनाम व इस्राएलविषयी अशी विधाने केली होती की, ती एका गटाला काही पचली नाहीत. या गटाने सीरहन सीरहन याला रॉबर्टचा खून करण्यासाठी प्रोग्रॅम केले. सीरहन सीरहन हा डावीकडे झुकलेला अरब होता. या कारणामुळे उजवी-कडे झुकलेल्या गटाविषयी कुणाला शंका येणार नाही असे कट करणाऱ्यांना वाटले. लुडलमनी असे मत देताना स्पष्ट म्हटले आहे की, हे विधान माझ्यातल्या Suspense novelist ने केले आहे. 'Fantasy करणे, fantasy पहाणे व मीठमसाला घालून ती डिशमध्ये वाचकाला देणे हे लेखकाचे काम आहे' असे ते एकदा म्हणाले होते.

त्यांची अगदी अलीकडची कादंबरी म्हणजे Matarese Circle. ही कट व हिंसा कर-णारी त्याच नावाची संस्था १९११ मध्ये कॉर्सिकात झाली होती. या संस्थेमागे माफियाचा प्रचंड पैसा उभा असतो. राजकीय हत्या वगैरे करून सुरुवातीला मॅटेरिझला अफाट पैसा मिळवायचा होता. नंतर बारे-माप सत्ता. कुणाचाही राजकीय काटा काढायचा असला तर या संस्थेकडे जायचे की त्याचे काम झाले.

'द हॉलक्राफ्ट कॉव्हेनन्ट' हे लुडलमच्या वरील पुस्तकाच्या आधी प्रकाशित झाले होते. तिसऱ्या राईशमधील हजारो लहान मुले सबमरीन व आगबोटीतून कुठे तरी लांब नेली गेली होती अशा अफवा त्या वेळेला प्रचलित होत्या. असल्या मुलांना die Somnenkinder (Children of the Sun) असे म्हणत. या प्रजेतूनच चौथी राईश निर्माण करण्याचा हेतू होता. आता ही मुले मोठी झाली असतील व देशादेशां-मध्ये ती शत्रुत्व निर्माण करत असतील असे लुडलमना वाटले. या पुस्तकात असाच एक अमेरिकन आर्किटेक्ट असतो. त्याचा बाप कोण असतो हे त्याला माहीत नसते. त्याच्या बापाने आणखी दोघांच्यां समवेत ७८०डॉलर्स चोरले होते. त्या मुलाला मग जीनिव्हामध्ये आणले जाते व या प्रचंड संपत्तीचा तो executor आहे असे सांगितले जाते. Holo-caust मध्ये जिवंत राहिलेल्यांना हे पैसे द्यावयाचे असतात असा एक Covenant असतो. यावरूनच या पुस्तकाचे नाव Hol-croft Covenant दिले गेले.

एकदा रॉबर्ट लुडलमला विचारण्यात आले की, तुमचा पुढचा बेत काय आहे? 'आकाशातील पुस्तकाच्या दुकानात जाई-पर्यंत लिहीत जाणे.' असे लुडलमनी उत्तर दिले!

लिहिणे ही काय एक 'पिशाच्चबाधा' आहे? का एक 'असाध्य रोग?'

— जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी, पुणे

# नृत्यनाट्य

## सदानंद बोरसे

सुरांच्या पंखांवरून आम्ही अलगद विरहत होतो. शहराचे दमट, कोंदट, घामेजलेले, गर्दीचे, गोंगाटाचे, घाईचे, चिकट वातावरण दूर कुठे तरी मागे राहिले होते. आजूबाजूला हिरवी वनश्री दाटत होती. अजून कुणा कारखान्याने तिच्यावर बलात्कार केला नव्हता. नागमोडी पायवाटेच्या टोकाला ते खेडेगाव दिसत होते. बासरीचे सूर, बैलांच्या गळ्यातील घुंगरं, काकणांची किणकिण हळूहळू एकमेकांत मिसळत होती. सहा तरुण आणि सहा ग्रामकन्या आम्हाला त्यांच्या खेडेगावाचे रंगभरे, सूरभरे दर्शन घडवीत होत्या. आम्ही मुग्ध होऊन रंग, नृत्य अन् संगीताच्या एकजीव लयीने बांधलेले ते रूप न्याहळीत होतो. त्या बारा जणांना आता दोन–दोन अस्तित्वे मिळाली होती– एक प्रत्येकाचे व्यक्ती म्हणून आणि दुसरे समूह म्हणून. प्रत्येक व्यक्ती वाकत होती, पुढेमागे हलत होती, कमीजास्त वेगाने पदन्यास करीत होती; त्याच वेळी तो समूह एकत्रित होत होता, पांगत होता, डोलत होता, एकमेकांत गुंतत होता, सुटत होता. हे सारे मुक्त होते; पण अनिर्बंध नव्हते. स्वच्छंद होते; पण भरकटलेले नव्हते. त्याला विशिष्ट आकर्षक आकार मिळत होता आणि तितक्याच लोभसपणे तो बदलतही होता. कधी तो आकार तिपदरी गोफाचा होता, कधी घाटावर पाणी भरणाऱ्या युवतींचा होता; कधी तर हुतुतूच्या खेळाचाही होता. खेळातील नृत्यमयता आणि नाचातील खेळी यांचे प्रत्ययकारी दर्शन घडत होते.

हे डोळ्यांपुढे साकारणारे ग्रामीण जीवन परिपूर्ण असल्याचा दावा त्या कलाकारांचाही नव्हता आणि आम्हालाही ते अपेक्षित नव्हते. 'माझे खेडेगाव' या नावाखाली त्यांनी जो मोकळा आविष्कार दाखविला, जे ताजे सूर ऐकवले ते संपूर्ण नसले; तरी दररोजच्या नीरस चाकोरीपेक्षा वेगळे होते, म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण होते, म्हणूनच विलक्षण सुखद होते.

□

शिवशक्तीचा 'शृंगार.' नृत्यसंगीतादि कलांचा जनक शंकर आणि त्याची जणू चेतना, प्रेरक हिमनगदुहिता पार्वती. त्यांचा तो नृत्यमय शृंगारही जणू ईश्वरीय वाटत होता. कधी शिवाभोवती गरगरत पार्वती त्याचे आराधन करीत होती; तर कधी पार्वतीभोवती फिरत शिव तिचे रंजन करीत होता. एकमेकांना आपल्या कलेने रिझविण्याचीच जणू त्यांची स्पर्धा चालली होती. कधी दोघेही जणू एकरूप होऊन जात होते. दोघांच्या मुद्रा, पदन्यास, हालचाली समान असोत वा वेगवेगळ्या; त्या उत्कट प्रीतीने भारलेल्या होत्या. शिवाच्या प्रत्येक हालचालीत त्याचे पौरुषयुक्त सामर्थ्य भरलेले होते, एखाद्या प्रचंड वृक्षाप्रमाणे काहीशी स्थिरता होती; तर पार्वतीची प्रत्येक हालचाल स्त्रीची चंचलता, काहीसा लाजरेपणा आणि तरीही आपल्या प्रियकराची अनावर ओढ सुचवत होती– जणू वृक्षाला लपेटणारी एखादी वेलच. शिवशक्तींच्या या शृंगारनृत्याने अखेरच्या अर्धनारीनटेश्वराच्या परिणामाने उत्कर्षबिंदू साधला.

□

'पालकी चले, पालकी चले, पालकी चले रे' हेमंतकुमारचे उत्साही शब्द.

ते बघा सहा कहार कुण्या हळदगोऱ्या नववधूची डोली घेऊन चाललेत. लांबच्या गावची, गावच्या राजाची लेक आपल्या हक्काच्या घरी चाललीय. दिवस उजाडतोय. नदीवर पाणी भरायला चाललेल्या बायका हळूच घुंघट बाजूला सारून डोली न्याहाळत आहेत. गावातली उघडीवाघडी पोरंटोरं गिल्ला करत डोलीमागे धावताहेत. दिवस हळूहळू चढत चाललाय. डोली पुढे पुढे चाललीय. कधी गावातून, कधी रानावनातून, डोंगरदऱ्यातून. या गावात बाजार भरलाय वाटतं. 'या दादा, बघा ताजी मासळी हाय.' 'भाजी तर आता मळ्यातनं तोडूनच हिकडं आणली.' फुगेवाला, कापडवाला, खेळणीवाला जो तो आपलाच माल घेण्याबद्दल आग्रह धरतोय. डोली बाजारातून पुढं चाललीय. एखादा भजनकरी नववधूला आशीर्वाद देतोय; तर एखादे अजन देठ हिरवा असलेले पिकले पान डोलीत डोकावण्याचा प्रयत्न करतंय. अरे, अरे, हे काय? या मासळीवालीची अन् भाजीवालीची चांगली जुंपली वाटतं. मग एक जोरकस भांडण अन् त्याची सोडवणूक.

डोली तिथूनही पुढे निघाली. दिवस उतरू लागला. सावल्या लांबू लागल्या. डोली मात्र चाललीच आहे. कधी ती इतक्या जवळ दिसते की, सूर्याला झाकून टाकते, तर कधी इतक्या लांब की, क्षितिजावर डोली आणि तिला वाहून नेणारे सहा कहारच फक्त सरकताना दिसतात.

या नववधूला पोहोचविले, आता दुसरीला घरी न्यायचे आहे. पुन्हा डोली निघाली, कहार निघाले.

दिवसांमागून दिवस, गावांमागून गावं, पावलांमागून पावलं, डोली जातच असते.

मागे हेमंतकुमार उदासवाणे गात असतो,

'पालकी चले, पालकी चले रेऽऽ'

(या संपूर्ण प्रकारात एखादी जिवंत व्यक्ती असावी, तसे काम म्हणजेच नृत्य त्या सहा कहारांच्या खांद्यावरच्या पालकीने– डोलीने केले आहे.)

□

दिवसभर शेतात राब-राबून थकलाभागला शेतकरी रात्री विसावला. त्याचा डोळा लागला न लागला, तोच 'तो' आला. तो आला होता एका लांबच्या शहरातून. शेतकऱ्याला अन् त्याच्या बायकोला त्याने आपल्या शहरात नेले.

अबबब! केवढे मोठे ते शहर. किती ती माणसं आणि सतत तालात घुमणारी केवढाली ती यंत्रं. शेतकऱ्याला अन् त्याच्या बायकोला तर यंत्रांच्या जंजाळात एखाद्या मोठ्या पट्ट्यातच अडकल्यासारखं वाटायला लागलं होतं. ही सगळी यंत्रं 'त्या'च्या एका इशाऱ्यावर हलत होती, वेगवेगळी कामं करत होती, 'त्या'च्या दैनंदिन गरजाच नव्हे तर ऐषरामाच्या चीजाही त्याला पुरवत होती; पण या सगळ्या यंत्रांना पोसण्यासाठी त्या माणसाला आपल्या उन्मुक्त निसर्गाला मुकावं लागलं होतं, आपल्या शांतीच्या, समाधानाच्या रक्ताचं वंगण तो त्या यंत्रराक्षसांना घालत होता, त्याच्यातला माणूसही हळूहळू एक निर्जीव, गार लोखंडी यंत्र बनत चालला होता. त्या यंत्रांपासून कसेबसे स्वतःला वाच-

वत शेतकऱ्याने पळ काढला; तर त्याचा कब्जा घेतला दोन पुढाऱ्यांनी. दोघांच्या झेंड्यांचे रंग वेगळे, टोप्या वेगळ्या; पण टोप्यांखालची डोकी मात्र सारख्याच स्वार्थी, भ्रष्ट विचारांनी बुजबुजलेली. त्यांनी आपल्या रस्सीखेचीत, बिचाऱ्या शेतकऱ्याची मात्र निष्कारण ओढाताण चालवली होती.

एवढ्यात शेतकऱ्याच्या बायकोने त्याला जागे केले. दिवस उजाडत होता. उगवतीला तांबडं फुटलं होतं. शिवमंदिरातून काकड्याचे स्वर येत होते. पूजेचे साहित्य घेऊन स्त्री-पुरुष देवळाकडेच जात होते. शेतकऱ्याने आणि त्याच्या पत्नीनेही भक्तिभावाने हात जोडले.

एक नवा दिवस उजाडत होता. धरणीच्या उदरातून प्रेमाच्या, समाधानाच्या ओला-व्याने आर्द्र झालेले धन काढण्यासाठी खांद्या-वर नांगर टाकून तो शेताकडे चालू लागला.

(या प्रसंगाचे नाव होते– 'शेतकऱ्याचे स्वप्न.' शहरी जीवनातील, त्याहूनही यंत्र-युगातील एकसुरी कंटाळा अन् तोचतोपणा दाखवण्याचा हा प्रयत्न. यंत्र बनलेल्या कला-कारांचे एकसारखे कपडे, त्यांच्या अत्यंत एकसारख्या कठपुतळी–हालचाली, निरर्थक बेसूर आवाज या साऱ्यांमधून या शुष्क सांगाड्यातील जीवनरस आटल्याने आलेला रखरखीतपणा बरेचदा प्रेक्षकाला बोचतो, खुपतो आणि शेवटी शेवटी तर कंटाळाही आणतो; पण प्रेक्षकाचा हा एकसुरी किंवा एकबेसुरी, लांबलचक उबग म्हणजेही त्या कलाकारांचे यशच म्हणता येईल, नाही?)

◻

स्वच्छ मोकळं मैदान. त्यात आसारी अन् मांजा धरलेला तो एकटा तरुण. स्वच्छ निळं आकाश. त्यात त्या तरुणाच्या हाताच्या इशाऱ्यावर डोलणारी ती तांबडी पतंग. (खरे म्हणजे ही एक नर्तिकाच; म्हणून ती एकुलती पतंग.) त्याने ढील दिला की, ती दुरावते, हवेवर तरंगते, वाऱ्यासवे हेल-कावते. त्याने दोरा हापसला की, ती वर चढते, गुंडाळला की, जवळ येते. त्याने हिसके मारले की, ती थरारते, धक्के बसल्या-गत लहरते.

चली चली रे पतंग मेरी चली रे! चली बादलों के पार, होके डोर पे सवार! (पतंग शब्द हिंदीत स्त्रीलिंगी का, हे जाणून घ्यायचं असेल, तर पतंग बनलेली, डोक्यावर पतं-गाचा शिरपेच ल्यालेली, दोन्ही हातांनीही चौकोनी पतंग बनवून उरलेले अंग पतंगाच्या शेपटीगत सळसळविणारी, लवलवणारी ती चवळीची कवळी शेंगच अशी नर्तिका पहा.)

अरेच्या, पण हे काय? हा दुसरा पतंगबाज आला. त्याच्या पिवळ्या पतंगानं अलगद झेप घेतली. पेच सुरू झाला. दोन्ही पतंग एकमेकांवर पडत होते, उचलले जात होते, मांजे गुंतत होते, सुटत होते. खेळाडूंच्या डावपेचाप्रमाणे पतंग झुलत होते. कटला, कटला, पिवळा पतंग कटला, लांब नजरेपल्याड गेला! तांबडा पतंग मात्र डौलात तरंगत होता. तेवढ्यात दुसऱ्या पतंगबाजानं तांबडा पतंग तोडला, पिवळा पतंगही पकडला अन् दोन्ही घेऊन स्वारी पसार!

(या पतंगाच्या खेळातील पतंगांचे वर्णन करण्यासाठी माझ्याजवळ शब्दच नाहीत. इतकंच सांगतो, निळ्या आभाळीचा त्यांचा डौलदार विहार पाहिला, तर खरा पतंग-सुद्धा लाजेनं मान खाली घालील.)

'ऋतुचक्रातील ग्रीष्माचा एक आरा सरकला होता. पाठोपाठ आली वर्षा.

सावळ्या मेघांनी निळ्या नभात दाटी केली होती. मधूनच एखादी धारदार वीज आसमंत उजळत चमकून जात होती. धूसर काळोख्या कुंभातून संततधार बरसत होती.

बरसातीच्या या पडद्यापलिकडे नजर लावून बसलेली ती श्यामला मात्र तडफडत होती, आपल्या प्रियाच्या आगमनाकडे डोळे लावून बसली होती, 'ये रे, सख्या, ही शीतल वर्षा माझा विरहाग्नी शांत करू शकत नाही. तुझ्या गाढ आलिंगनासाठी माझं गात्र गात्र आसुसलं आहे. जिवलगा, लौकर ये–!'

आणि तो आला. खरंच तो आला.

त्याच्या येण्यानं जणू तिच्या अंगात उत्साहाची वीज संचरली. तिच्याइतकाच तोही अधीरला होताच आणि मग दोघांच्या अवघ्या देहाचे जणू एकच आभाळ बनले आणि प्रणयाच्या ढगांनी ते भरून गेले!

(वर्षाऋतूचे दर्शन घडविणाऱ्या या प्रसंगात नर्तिकेचा पोषाखाला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. तिच्या सावळ्या तनुलतेला वेढलेल्या चंदेरी किनारीच्या काळ्या पोषाखामुळे कृष्णमेघ आणि त्यातून तळपत्या विजेचाच आभास तिच्या प्रत्येक हालचालीतून होत होता.)

अखंड पर्जन्यवृष्टीने भरून गेलेली नदी हेमंतऋतूतही दुथडीच होती.

त्या पाच मासोळ्या दुथडी भरून वाह-णाऱ्या नदीत विहार करीत होत्या. प्रवाहात सळसळणारी त्यांची शरीरं, दिशा बदलताना वळणाऱ्या शेपट्या–छे, मासोळ्या कसल्या जणू जलपऱ्याच!

हेमंत गेला, शिशिरही सरला आणि वसंतपंचमीचे रंग उधळत वसंतऋतू आला. वसंत म्हणजे मूर्तिमंत मुसमुसते तारुण्य. उत्साहाने, उल्हासाने उफाळणारे, उसळणारे यौवन. त्यात विविध रंगांची उधळण करीत तरुण देहमनांना प्रीतीच्या गुलाबी रंगात रंगून टाकणारा वसंतपंचमीचा उत्सव!

रंगांच्या पिचकाऱ्या उडत जात होत्या.

या धामधुमीतच 'ऋतुचक्रा'चा फेरा पूर्ण झाला.

◻

दुःखाचे घट रिचवून सुखी भवितव्याच्या आशेवर जगण्यासाठी विस्मृती हे वरदान असेलही कदाचित; पण वार्धक्याने माण-साच्या चेहऱ्यावर आपल्या अमीट रेषांचे जाळे पांघरले, शरीरातील जीवनरस हळूहळू सुकू लागला की, तारुण्यातील रसपूर्ण विभोर 'स्मृती' माणसाला वरदान वाटत असतात. शून्यात नजर लावून बसलेल्या त्या म्हाताऱ्या जोडप्याच्या मनातही तारुण्या-तील तो आणि ती दाटून येतात. ते दिवस, ते आकर्षण, त्या क्रीडा... एक दिवस 'दुसरी'मुळे आलेला दुरावा आणि ती 'दुसरी' दूर गेल्यावर झालेले मीलन, सारेच कसे रम्य, ताजे आणि अगदी काल-परवा घडल्यासारखे. मनाच्या मखमलीत त्या स्मृती जपून ठेवायला हव्यात.

◻

'आकाश थोडंसं ढगाळ आहे. इथं अ संघाचा आणि ब संघाचा कप्तान आणि दोन्ही पंच नाणेफेकीसाठी एकत्र आले आहेत. क्रीडांगणावर जवळजवळ सात ते आठ इतक्या प्रचंड संख्येने प्रेक्षक उपस्थित आहेत. मला वाटतं, संघाचा कप्तान हर्षभरित दिसतोय; त्या अर्थी त्यानं नाणेफेक जिंकली असावी. तर त्यानं नाणेफेक जिंकून क्षेत्र-रक्षण स्वीकारले आहे. दोन्ही फलंदाज मैदानात येत आहेत. ब संघाचे खेळाडू थोडेसे 'वॉमिंग अप' करीत आहेत–' (अशा रीतीनं हा क्रिकेटचा खेळ पुढं नाचत राहतो.

क्रिकेटमधील चौकार-षट्कारांपासून सूर मारणे, फलंदाजांमध्ये धाव काढताना झालेला गोंधळ, नापसंत निकालाविरुद्ध पंचांचा गळा धरणे, एखाद्या क्रेझी युवतीने धावत मैदानात येऊन 'खास' अभिनंदन करणे ते शेवटी दंगल होऊन खेळ बंद पडणे येथपर्यंत सर्व गोष्टी यात आहेत. फक्त एकच–हा खेळ, खेळ राहून येथेच थांबला असता तर बरे झाले असते. नंतर एका क्रिकेटपटू भोवती पडलेला मुलींचा गराडा, मग सगळयांचा नाच आणि नंतर एकेका तरुणाने ओढत घेऊन जाणे हा सगळा प्रकार स्वस्त आणि बाजारू बनतो. असो. इतक्या सुंदर चेहऱ्याला हे एवढे काजळाचे गालबोट हवेच. ◘

बी. जे. मेडिकल कॉलेजच्या आर्ट सर्कल-तर्फे शनिवार दि. ११ ऑगस्ट रोजी बाल-गंधर्व रंगमंदिरात सचिन शंकर यांच्या युनिटचा नृत्यनाटयाचा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रतिवर्षी नृत्य, संगीत, नाटय इत्यादी विविध कलांचा मान्यवर कलावंतांच्या प्रतिभेतून जन्मणारा आविष्कार पुणेकर रसिकांना सादर कर-णारी आर्टस सर्कल ही अग्रगण्य संस्था. या वर्षीचे हे संस्थेचे तेविसावे वर्ष !

सचिन शंकर यांच्या युनिटने आधी उल्लेख केलेले सात प्रसंग आणि 'जलपरी' हे दीर्घ लांबीचे कथानक नृत्यनाटयाद्वारे सादर केले. नृत्याची बाजू स्वतः सचिन शंकर, कुमुदिनी शंकर आणि अन्य साथी कलावंतांनी पेलली होती तर संगीताला पं. रविशंकर, अनिल विश्वास, सलिल चौधरी आणि हेमंतकुमार यांचा भरभक्कम आधार लाभला होता. या चौघांची नावे सांगण्या-व्यतिरिक्त संगीताबद्दल लिहिण्यासाठी शब्द कोठून आणू ? प्रत्येक प्रसंग जिवंत करण्यात संगीताप्रमाणेच प्रकाशयोजनेचा (विशेषतः मागे पडद्यावर साधलेले पालखी, पाऊस, प्रवाही नदी आणि नावेचे परिणाम) मोठा वाटा. आणि सर्वांत मोठा भाग–सर्वच नर्तक–नर्तिकांचा. त्यांनी नखशिखांत जीव ओतून कित्येक बारकाव्यांसकट प्रत्येक प्रसंग जिवंत केला.

शेवटी कार्यक्रमाचा पडदा पडल्यानंतर पुन्हा पडदा उघडून सर्व कलावंतांनी प्रेक्ष-कांना अभिवादन केले, त्या वेळी टाळयांचा जो कडकडाट झाला; त्यात बऱ्याच टाळया आपल्याही होत्या. ◘

रंगभूमी (दूरदर्शन) । विनया खडपेकर

# पुन्हा पहावेसे वाटणारे 'नांदी नाट्य'

बुधवार दि. २९ ऑगस्ट या दिवशी रात्री नऊ नंतरचा दूरचित्रवाणीवरील एक कार्यक्रम "नांदी नाट्य." जामानिमा करून मंडळी सिद्ध झाली होती. सूत्रधार-नटी प्रवे-शाच्या शैलीत श्री. भालचंद्र पेंढारकर आणि मालती पेंढारकर यांनी प्रस्तावना केली. निरनिराळ्या नाटकातील नांद्या आणि पदे सादर करणार असल्याचे सांगितले. कला-कारांनी हातातल्या तबकातली फुले उधळली आणि सर्वप्रथम सुरू झाली किर्लोस्करांच्या 'शाकुंतल' ची नांदी. पाठोपाठ आश्विनी भिडे यांचे पद. मग खाडिलकरांच्या 'स्वयं-वरा' ची नांदी आणि निर्मला गोगटे यांचे 'नरवर कृष्णासमान' ! देवलांच्या संशय-कल्लोळ' ची नांदी 'सौख्यसुधा' आणि अजित कडकडे यांचे 'सुकान्त चंद्रानना' च्या पाठोपाठ 'जय जय गौरीशंकर' आणि 'कट्यार काळजात घुसली' नांदी, पदे—

प्रत्येक नांदीचे शब्द वेगळे ! सूर वेगळे ! पण साऱ्यातून एक धुंद मांगल्य स्रवत होते. मनाची काहीतरी उघडमिट झाली. एका खोलीच्या बिऱ्हाडात रहात असताना जुन्या पैठणीची एखादी चिंधी हाती यावी आणि सारे गतवैभव दिसू लागावे तसे झाले. मन काही काल रंगभूमीच्या त्या न पाहिलेल्या भूतकालाकडे झेपावले. गॅसबत्तीच्या प्रकाशात उजळलेली नाटयगृहे मनात तरळू लागली. बालगंधर्वांच्या शालूच्या जरतारी आल्या-यिका झगमगू लागल्या. अतरांचा सुगंध रेंगाळू लागला—

डोळे समोरची दृश्ये टिपत होते. छेः एक-जण किती बावळा दिसतो आहे. कशाला घेतला त्याला ? चच् ही काय शकुंतला ? ती वयाने कोवळी हवी ! चवळीच्या शेंगेसारखी लवलवणारी हवी ! शंकराची जटा केव-ढीच्या केवढी उंच. त्या जटेच्या टोकावर ती गंगेची बाहुली पाहून हसूच लोटत होते. शंकराच्या अंगावर कसले तरी चट्टयापट्टयाचे चटोर कापड ! यांना खरे खोटे व्याघ्राजिन मिळू नये ? शंकराच्या गळयात साप नको का ? एक ना दोन अशा सतरा गोष्टी ! डोक्यातली चिकित्सा बुद्धी कितीतरी सया टोचीत होती. पण नांदीच्या स्वरांबरोबर मन मात्र वाहून जात होते. बालगंधर्वांच्या त्या झळकत्या नगरीमधे !—नाटकमंडळयांची ती शे दीडशे माणसांची कुटुंबे. त्यांच्या शालु शेल्याचे, तंबोरा तबल्यांचे ते सरदारी सरं-जाम ! त्यांच्या जेवणाच्या पंक्ती, तेथले डावे उजवे मानसन्मान—

खरे म्हणजे नाटकाला नांदी हवीच! किती सुंदर असते ती ! तरी ती गेलीच. अशा कितीतरी गोष्टी निघून जातात. ट्रॅम नाही का गेली ? मजेची थरथर करत, संथ गतीने स्वस्तात कुठेकुठे फिरवून आणणारी ट्रॅम ! पण; पण ट्रॅमला जाताना निरोप तरी दिला होता. नांदीचे तसे नाही. नांदी केव्हा गेली, कशी गेली, का गेली ते कळलेच नाही. अगदी न सांगता निघून गेली.

अगदी पूर्वी पडदा उघडून, फुले उधळीत ती स्वरांचे मोहजाल प्रेक्षकांवर पसरून द्यायची. तेव्हा ही नांदी प्रेक्षक जसे काही मूर्तीमंत पहातच होते. नंतर ती पडद्याआड गेली. न दिसता फक्त ऐकूच येऊ लागली. नंतर अनेकांऐवजी एकाच्याच आवाजात ऐकू येऊ लागली. आणि अशी एकेक पाऊल मागे सरत लुप्तच झाली. सनईचौघडयाशिवाय शुभ-मंगल तसे नांदीशिवाय नाटक खरे म्हणजे भुंडे वाटते. त्या भुंडेपणाची आता सवयही झाली आहे. तरीही चाळीतल्या हौशी मंडळींच्या नाटकाआधी, नांदीचे सूर ऐकू येतात आणि तिच्या हरवलेपणाची जाणीव होते. एक व्याकूळता स्पर्शून जाते.

नाटकांचे विषय बदलले. अभिनयशैली बदलल्या. सादर करण्याच्या पद्धती बदलल्या या बदलण्यातच रंगभूमीचा विकास आहे. तिचे फुलतेपण आहे; पण तरी नांदी कशाला काढून टाकली ? रंगभूमीच्या सगळ्या पिढ्यांना एका साखळीत गोवणारा हा चिवट धागा. वाहत्या कालप्रवाहात सगळ्या पिढ्यांना जोडू शकणारे काही चिवट, मधूर धागे जपायला हवेतच की !

'नांदी नाट्य' सादर करून दूरचित्र-वाणीने आम्हाला नांदीचे एक चालते बोलते म्यूझियमच दाखविले. त्यात कितीही दोष असले तरीही ते पुन्हा पहावेसे वाटते. ◘

# छिन्न : एक प्रतिक्रिया

'माणूस'च्या दि. २३ ऑगस्टच्या अंकातील 'छिन्न' या नवीन नाटकावरील विनया खड्पेकर यांचा अभिप्राय वाचला. एका चांगल्या नाटकाला पानभरात उडवून या नाटकावर अन्याय झाला आहे, असं वाटल्यामुळे या ठिकाणी माझी प्रतिक्रिया नोंदवत आहे.

'मराठी रंगभूमीचे आता 'लैंगिकते' शिवाय पान हालेनासे झाले आहे.' असं खडपेकरांनी अभिप्रायाच्या सुरवातीला म्हटले आहे. हे योग्य वाटत नाही. कारण अजूनहीं मराठी रंगभूमीवर 'अजून यौवनात मी' किंवा 'घालीन लोटांगण' सारखी खुसखुशीत आणि अगदी कुटुंबासमवेत पहावीत अशी नाटके आलेली आहेत. उत्तम प्रकारे यशस्वीही झाली आहेत. (मागे 'अजून यौवनात मी' हे चांगलं नाटकही खडपेकरांनी एका पानात उडवलं होते. नाटक वाईट आहे असं वाटणें मी समजू शकतो, पण मग तसं म्हणणाऱ्याने ते कसं वाईट आहे हेही सविस्तर विश्लेषणातून दाखवून दिले पाहिजे. असो.)

'छिन्न' वर लिहिताना सुरवातीलाच त्यानी असं म्हटलं आहे की हल्ली काही तरी सनसनाटी निर्माण करण्याचं चलनी नाणं म्हणून लैंगिकता हा विषय वापरला गेला आहे. माझ्या मते, मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये देखील काही वेळा आढळणाऱ्या एका सामाजिक अनुभवाचं सुन्न करणारे चित्रण या नाटकात आहे. आता हा अनुभव लैंगिक क्षेत्रातील आहे, पण म्हणून धंद्यासाठीच तो सादर केला गेला असला पाहिजे, असा परस्पर निष्कर्ष काढणं थोडंसे अन्यायकारक होईल. नवऱ्याकडून लैंगिक सुख मिळत नाही म्हणून किंवा जीवनात लैंगिक सुखापलीकडे दुसरं सुख मिळण्याची शक्यताच नाही म्हणून एखादी प्रौढ विवाहित स्त्री एखाद्या तरुण मुलाला जवळ करते, हा आपल्याही समाजात अनेक ठिकाणी येणारा अनुभव आहे. फक्त ते अनैतिक (तथाकथित) आहे म्हणून, किंवा ते पेलण्याची आपली हिंमत नाही म्हणून आपण त्याकडे कानाडोळा करतो. पण सदाशिव अमरापूरकरांसारखा दिग्दर्शक ते अतिशय कलात्मकपणे, संयमितपणे रंगमंचावर दाखवून पाहणाऱ्याला सुन्न करून सोडतो.

नाटकातील उल्लेखांवरून सिंधूच्या (प्रौढ विवाहित स्त्री) जीवनात अनेक पुरुष येऊन गेले आहेत. याचे कारण कोणते असा प्रश्न खडपेकरांना पडला आहे. खरं म्हणजे याचं उत्तर मीच वरील परिच्छेदात दिलं आहे, पण त्याहीपुढे जाऊन मी असं म्हणेन की, नाटकातील पात्राच्या जीवनाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे सर्व धागेदोरे त्या अडीच-तीन तासांतच आपल्याला संपूर्णपणे कळले पाहिजेत हा पारंपारिक अट्टाहास कशासाठी? 'छिन्न'मध्ये मुख्य मुद्दा सिंधूच्या जीवनात अनेक पुरुष येऊन गेले हा नसून काही तरी सुख सतत मिळवण्याची त्या स्त्रीची धडपड आणि तिच्या सुखाच्या कल्पनेतून आणि वर्तनातून उद्ध्वस्त होणारं तिचं घरकुल, हा या नाटकाचा मुख्य विषय आहे. जीवनात दुसरं कोणतंही सुख मिळणं शक्य नाही, याची खात्री झालेली सिंधू श्रीकांत या घरात आलेल्या तरुण मुलाचा तरी 'आधार' तुटू नये म्हणून स्वतःच्या मुलीशीच त्याचं लग्न लावून देते व आपलं सुख कायम ठेवण्याचा प्रयत्न करते, हा भागही अतिशय धक्कादायक; पण तरीदेखील वास्तवतेची पातळी न सोडणारा आहे.

आता शालीला (सिंधूच्या मुलीला) श्रीकांत–सिंधू-प्रकरण कसे कळते, हाही एक खडपेकरांना पडलेला क्षुल्लक प्रश्न. मुंबईच्या चाळींचं जीवन ज्यांनी पाहिलं आहे, अनुभवलं आहे त्यांना हा प्रश्न पडणार नाही. इथल्या प्रत्येक चाळीमध्ये चाळीतील लोकांची कुत्री–कुलंगडी बाहेर काढणे, काही नसलीच तर स्वतः रचून पसरवणे हाच उद्योग काही माणसे न कंटाळता आयुष्यभर करत असतात. शालीला हे लोकांकडून कळलं म्हणावं तर ते लग्नापूर्वीच कसं कळलं नाही, असंही खडपेकर विचारतात. तार्किकतेच्या दृष्टीने हे बरोबर असेलही कदाचित; पण व्यवहारात ते दरवेळी योग्य असतंच असं नाही. आपल्या सर्वांच्याच जीवनात कित्येक गोष्टी आपल्या अगदी नाकाखाली घडत असतात; पण बऱ्याच काळपर्यंत आपल्याला त्याचा पत्तादेखील लागत नसतो आणि त्याहीपुढे जाऊन मी असं म्हणेन की, तुम्ही नाटक म्हणून काही concessions देणार आहात की नाही? साधा मुद्दा आहे की, जर हे शालीला आधीच कळलं असतं तर तिने श्रीकांतशी लग्नच केलं नसतं आणि मग पुढे उभं राहिलेलं थरारून सोडणारं नाट्य घडलंच नसतं. 'रोमिओ–ज्युलिएट'-सारख्या नाटकात सर्व पहारेकऱ्यांचा पहारा चुकवून रोमिओ ज्युलिएटच्या खिडकीखाली आला या प्रसंगातलं माधुर्य न चाखता त्याने पहारा कसा चुकवला असेल, पहारेकरी झोपले होते का, का त्यांच्याशी मारामारी करून रोमिओने एकेकाचे मुडदे पाडले आणि मगच तो ज्युलिएटच्या खिडकीखाली आला असे प्रश्न विचारत बसण्यासारखं हे आहे.

भाजीवाला आणि आप्पाचा दारुडा मित्र ही पात्रं संपूर्णपणे अनावश्यक वाटतात, असं खडपेकर म्हणतात. माझ्या मते नाटकाचा अनुभव या पात्रांनी अधिक घट्ट व रसरशीत केला आहे. भाजीवालीबरोबरचं सिंधूचं

दृश्य जर खडपेकरांनी नीट टिपलं असेल तर त्यांच्या हे लक्षात आलं असेल की, सिंधू भाजीची एक गड्डी पैसे देऊन घेते आणि भाजीवाली टोपली डोक्यावर ठेवून उठत असताना व सिंधूकडे तिची पाठ असताना टोपलीतली आणखी एक गड्डी सिंधू मोठ्या चपळाईने लांबवते. हा अतिशय करुण प्रसंग आहे. पोटच्या पोरांना गोड खायला मिळावं म्हणून जिलब्या चोरणारी आई इथेही आहे. सिंधूच्या संसारातलं दारिद्र्य आणि त्या दारिद्र्याला जमेल त्या प्रकारे, जमेल त्या तऱ्हेने तोंड देणारी सिंधू या प्रसंगातून मोठ्या प्रभावीपणे व्यक्त होते. आप्पाचा दारुणा मित्र वरकरणी उथळ वाटतो; पण त्याच्याही जीवनातलं, दारूच्या प्याल्यात बुडू पाहणारं दुःख अरुणने आत्महत्या केल्यावर जेव्हा हा मित्र आप्पाला बोलवायला येतो तेव्हा हिमनगासारखं वर येतं.

घरातला वापरता पाटा नुकतीच टाकी मारलेला कोरा करकरीत वाटत होता, हा खडपेकरांना दिसलेला आणखी एक दोष. मी म्हणतो, हा पाटा 'वापरता' होता, हे खडपेकरांना कसं कळलं? कदाचित असंही असेल की, पाट्याला नुकतीच टाकी मारून आणली असेल आणि छिन्नीचे त्याच्यावर बसलेले घाव विरत नाहीत तोच त्याचाच उपयोग करून शाली आपल्या पतीशी संबंध ठेवणाऱ्या आईला नष्ट करू इच्छिते.


नाटकाच्या तिसऱ्या अंकाचा तर खडपेकरांनी उल्लेखही केलेला नाही आणि माझ्या मते हा अंक म्हणजे नाटकाचा खुर्चीला खिळवणारा उत्कर्षबिंदू आहे. शाली आणि सिंधूमधील द्वंद्व—शारीरिक व मानसिक—याच अंकात परमोच्च बिंदू साधतं. या ठिकाणी शाली सिंधूला जे काही बोलते ते कदाचित कोणाला भडक वाटेल; पण आजपर्यंत तिने स्वतःचा करून घेतलेला कोंडमारा पाहता हा उद्रेकही स्वाभाविकच वाटतो.

अभिनयाचा उल्लेख करताना जसा या दोघींचा उल्लेख विशेषत्वाने केला पाहिजे तसाच बिराज चिटणीस आणि श्याम चिपळूणकर या दोन १५–१६ वर्षांच्या मुलांचाही केला पाहिजे. त्यांच्या वागण्या–बोलण्यातील सहजता केवळ कौतुकास्पद आहे.

थोडक्यात, लैंगिक विषयावरील चलनी नाणं म्हणून 'छिन्न'ला dismiss न करता प्रक्षोभक सामाजिक विषयाचं संयमित आणि तरीही अतिशय प्रभावी चित्रण ही नाण्याची दुसरी बाजूही पाहिली गेली पाहिजे, असं मला वाटतं.

—सतीश कामत

---

हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.
(रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८)

—डॉ. वा. ना. कुबेर

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

# चित्रपटाबाहेर....

प्रसिद्ध दिग्दर्शक रवी टंडन सध्या एका निराळ्याच अडचणीत सापडला आहे. झालंय असं की धर्मेंद्रने त्याला येणारे वेळी-अवेळी फोन्स टाळण्यासाठी आपला फोनच बदलून घेतला. (आता हे फोन कोणाचे किंवा कोणाकोणाचे हेही उघड गुपित आहे.) आणि त्याचा बदललेला फोन रवीला मिळाला. त्यामुळे सध्या धर्मेंद्रला येणाऱ्या सर्व फोन्सची उत्तरं रवीलाच द्यावी लागतात. प्रथम तो सभ्यपणे सगळा खुलासा करतो, पण त्यावर समाधान झालं तर त्यांना 'फॅन्स्' कसं म्हणायचं? कारण 'फॅन' हा 'फॅनॅटिक्'चाच अपभ्रंश किंवा शॉर्ट फॉर्म असणार. परवा तर असाच एक फोन आला आणि जेव्हा रवीने सांगितलं की धर्मेंद्रचा फोन बदलला आहे, मी दिग्दर्शक रवी टंडन बोलतोय, तेव्हा पलिकडून आवाज आला, 'ए धर्मेंद्रके चमचे हम हेमामालिनीके घरसे बोल रहे हैं...।'

खरंच, धर्मेंद्रचा हा बदललेला फोन हेमामालिनीला मिळाला असता तर काय मजा आली असती! हेमालाही आपल्या शत्रूंची (सवतींचीही?) थोडी कल्पना आली असती. ◻

राहायला जागा नसणं किंवा हवी तशी तशी जागा मिळवण्यासाठी वणवण भटकावं लागणं हे काही वेळा बड्या बड्या स्टार्सच्याही नशिवी येऊ शकतं, हे सांगूनही खरं वाटणार नाहीं. पण आजही एक स्टार असा घराच्या शोधात हिंडतोय. त्याचं नाव आहे ऋषीकपूर! ३ नोव्हेंबरला नीतूशी लग्न झाल्यावर दोघांचं वेगळं, स्वतंत्र घर असावं. या मध्यमवर्गीय राजा-राणी संसाराच्या कल्पनेतून ऋषि-नीतूही सुटू शकलेले नाहीत आणि म्हणूनच ऋषि आता मुंबईत जागेसाठी हिंडतोय.

अर्थात त्याला हवी तशी जागा मिळाली तरी लग्नानंतर लगेच हे राजा-राणी त्या ठिकाणी राहायला जाऊ शकणार नाहीत. कारण 'इंटिरिअर डेकोरेशन' तर पुरं व्हायला पाहिजे आणि या अभिनेत्यांच्या घरांचं डेकोरेशन महिने-महिने चालतं. कारण त्यातल्या बऱ्याच वस्तू परदेशातूनही आयात केल्या जातात. त्यामुळे लग्नानंतरही काही काळ नीतूला आपल्या मामंजींच्या राजवाड्यातच राहावं लागणार आहे. आता याचा गैरफायदा घेऊन राजकपूरने आणखी एक 'कल, आज और कल' काढला नाही म्हणजे मिळवलं ◻

सुप्रसिद्ध चरित्र-अभिनेत्री ललिता पवारचा तिने आपल्या सिनेसृष्टीतील कारकीर्दीला पन्नास वर्षं पूर्ण केल्याबद्दल तिच्या चाहत्यांतर्फे भव्य सत्कार करण्यात आला. या सत्काराच्या वेळी ललिता पवारला म्हणे इतकं भरून आलं की, ती एक शब्दही बोलू शकली नाही शेवटी तिच्या भावना तिला लिहायला सांगण्यात आलं. तेव्हा तिने एका कागदावर दोनच शब्द लिहिले– 'Thank You!'

हे सगळं रुढीला धरूनच झालं; पण त्यानंतर फिल्म–इंडस्ट्रीत अनेक वावड्या उठल्या. कोणी म्हणालं, सत्काराच्या वेळीही ललिता पवारने अभिनयच केला, तर कोणी तरी म्हणालं, छे छे, तिचं हृदय खरोखरच भरून आलं असलं पाहिजे. तिला जर अभिनय येत असता तर तिच्या सिनेमातही तो कुठे तरी दिसला असता की नाही? कोणी तरी अशीही माहिती काढली की, या कार्यक्रमाला स्वतःला ललिता पवारचे वारसदार म्हणवणारेच बहुसंख्य होते, तर कोणीच काही करत नाही म्हटल्यावर ललिता पवारने स्वखर्चानेच हा कार्यक्रम घडवून आणल्याचंही फिल्म-इंडस्ट्रीत बोललं जात आहे.

आमची एकच इच्छा होती की, या निमित्ताने तरी ललिताजींनी सिनेसृष्टीतून निवृत्त व्हायला हवं होतं. तेच त्यांचं हिंदी चित्रपटसृष्टीला कॉन्ट्रीब्यूशन झालं असतं. ◻

'गमन' आणि 'नूरी' या दोन चित्रपटांमधून चांगलाच वर येत असलेला फारूख शेख मुझफ्फर अलींच्या दिग्दर्शनाखाली आणखीही एका अतिशय वेगळ्या चित्रपटात काम करत आहे. चित्रपटाचे नाव अजून निश्चित झालेलं नाही; पण १८५० च्या सुमारास लखनौमध्ये राहणाऱ्या एका नबाबाभोवती गुंफला जात आहे. एका अतिशय प्रसिद्ध उर्दू कादंबरीवरून या चित्रपटाची पटकथा तयार केली जात आहे. लखनौचा हा नबाब एका नाचणाऱ्या आणि उत्तम कवयित्री असणाऱ्या मुलीच्या प्रेमात पडतो आणि वाहवत जातो अशी ही कथा आहे. या मुलीचं काम रेखा करत्येय आणि रेखाबरोबर काम करायला मिळतंय यावर फारूख जास्त खूष आहे.

हा चित्रपट प्रत्यक्षात कसा पडद्यावर येतो ते पाह्यचं; पण सध्या हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये १८०० ते १९०० या काळाबद्दल आणि त्यातही लखनवी नबाबांबद्दल फारच आकर्षण निर्माण झालेलं दिसतंय. (पहा 'शतरंजके खिलाडी' 'जुनून' इ.) तूर्त तरी वाट पाहाणं, एवढंच आपल्या हातात आहे. कथा तरी भलतीच रोमँटिक वाटतेय; पण आपण काय करणार? आम्हीही सुंदर झालो असतो' असं म्हणत सुस्कारा टाकणं एवढंच आपल्या हातात आहे. ◻

एकदा आय. एस. जोहर आणि प्रोतिमा (पूर्वाश्रमीची सौ. कबीर बेदी) एका आलिशान हॉटेलात जेवत बसल्याचे एका पत्रकारानं पाहिलं आणि दुसऱ्याच दिवशी त्याने आय. एस्. जोहरला गाठलं.

'कबूल कर! काय भानगड आहे?'

'कुठे काय?'

'काल मी तुला आणि प्रोतिमाला ××× मध्ये जेवताना पाहिलं.'

'ओह ! तुला माहितेय ?'

'काय ?' (पत्रकाराच्या चेहऱ्यावर उत्कंठा ढगासारखी 'कालच्या तेवढ्या एका जेवणासाठी मला दोनशे सव्वीस रुपये बिल द्यावे लागलं.'

आता यावर पत्रकार काय बोलणार ? समोर चेहरा कितीही सुंदर असला तरी काहीजण किती 'जमिनीवर' असतात याचा हा एक अनुभव होता ◻

'देवदास' या चित्रपटाने अनेकजणांना वारंवार आव्हान दिलं आहे आणि पराभूतही केलं आहे. निर्माता कैलाश चोप्रानी आता या विषयाला हात घातला आहे. म्हणजे तसा त्यांनी हात केव्हाच घातला. होता, पण गेल्या दीड-दोन वर्षात त्यांच्या काही फारसं हाताला लागलंच नाही. आता मात्र सर्व जुळणी पूर्ण होत आली आहे. अन्वर हुसेन आणि दीना पाठक देवदासच्या पिता-माता असून सत्येन कप्पू धरमदास या देवदासच्या प्रामाणिक नोकराची भूमिका करत आहे. देवदास, चंद्रमुखी आणि पारोच्या भूमिका अर्थातच धर्मेंद्र, शर्मिला आणि हेमामालिनी करत आहेत. पारो ज्याच्याशी लग्न करते त्या जमीनदाराची भूमिका कोण करणार हे मात्र अजून निश्चित झालेलं नाही. बहुतेक डॉ. लागू हा रोल पळवणार, अशी फिल्म-इंडस्ट्रीत बोलवा आहे.


# सांगत्ये ऐका



रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र
तिसरी आवृत्ती
किंमत बारा रुपये
लवकरच प्रसिद्धी

राजहंस प्रकाशन, पुणे ३०